


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट



वर्ष १६ । अंक ६० । शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ । मूल्य ५ । पृष्ठे ८ । अकोला ■ RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com


## »थोडक्यात

### हायवेवरील अपघातात इंजिनिअरिंगच्या आठ विद्यार्थ्यांचा करुण अंत!

**त्रिशूर :** महामार्गावर उभ्या असलेल्या लॉरीवर मागून कार आदळल्यामुळे केरळमधील त्रिशूर जिल्ह्यात शुक्रवारी रात्री उशिरा भीषण अपघात झाला. यामध्ये तामिळनाडूत इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणाऱ्या आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. ही दुर्घटना रात्री ११.४० वाजताच्या सुमारास कैपामंगलममधील पनांबिक्कुन्नू येथे घडली. कार गुरुवायूरहून कोडुंगलूरच्या दिशेने जाताना हा अपघात झाला. हा अपघात एवढा भीषण होता की, प्रवाशांचे शव बाहेर काढण्यासाठी गाडी कापून उघडावी लागली.

---

### राज्यात चालू महिन्यात १४ टक्के पाऊसतूट

**मुंबई :** सप्टेंबर पहिल्या आठवड्याच्या अखेरीस देशात सरासरीपेक्षा १३ टक्के पावसाची तूट असून, राज्यात १४ टक्के तूट आहे. भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या पुढच्या चार आठवड्यांच्या अंदाजानुसार ही माहिती देण्यात आली आहे. ३ सप्टेंबरपासून १० सप्टेंबरपर्यंतच्या आठवड्यामध्ये राज्यभरात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी असेल. बंगालच्या उपसागरातील प्रणालीमुळे विदर्भाला फायदा मिळू शकतो. त्या पुढच्या आठवड्यांसाठी वर्तवण्यात आलेल्या अंदाजाबद्दल खात्री कमी असली तरी नंतरच्या दोन आठवड्यांमध्ये मराठवाडा आणि कोकणाला फायदा होऊ शकेल.

---

### नेपाळ महापूर : २७५ भारतीय अजूनही बेपत्ता!

**काठमांडू :** नेपाळ-तिबेट सीमेवर २६ ऑगस्ट रोजी आलेल्या विनाशकारी ढगफुटी आणि महापुरामळे मोठे संकट निर्माण झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत अडकलेल्या १६६ भारतीय नागरिकांना आतापर्यंत सुखरूप बाहेर काढण्यात आले असून तब्बल २७५ भारतीय नागरिक अद्याप बेपत्ता आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने शुक्रवारी पत्रकार परिषदेत ही अधिकृत माहिती दिली. याशिवाय, चीनच्या तिबेट स्वायत्त क्षेत्रात अडकलेले १,९०७ भारतीय नागरिक सुरक्षितपणे नेपाळच्या हद्दीत परतले असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नेपाळी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पूरग्रस्त भागातून अधिक मृतदेह बाहेर काढण्यात आल्यानंतर या महापुरातील मृतांचा आकडा १३४४ वर पोहोचला आहे.

---

### नरहरी झिरवाळ यांना समन्स बजावा - खा. राऊत

**मुंबई :** राज्यात एमपीएससी पेपरफुटी प्रकरण गाजत असताना या प्रकरणात आता धक्कादायक माहिती समोर आली आहे. एमपीएससीच्या औषध निरीक्षक पेपरफुटी प्रकरणातील आरोपी गौरव पाटीलच्या घरात मंत्री नरहरी झिरवाळांचे विशेष कार्य अधिकारी तीन वर्षांपासून भाडेकरून म्हणून वास्तव्याला असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी तर या प्रकरणी मंत्री नरहरी झिरवाळ यांना समन्स बजावून त्यांची चौकशी करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात ठाकरे गटाने उडी घेतल्याने झिरवळ यांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. खा. संजय राऊत यांनी मीडियाशी संवाद साधताना ही मागणी केली आहे.

# राज्यात दहीहंडीचा जल्लोष!

## मुख्यमंत्री फडणवीसांनी मुंबईत फोडली हंडी, मुंबईत ९ व्या थरावरून गोविंदा कोसळला

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**मुंबई :** राज्यभरात आज दहीहंडी उत्सव अत्यंत उत्साहात आणि मोठ्या जल्लोषात साजरा केला जात आहे. यंदा विविध दहीहंडी आयोजक आणि मंडळांकडून निष्णात गोविंदा पथकांसाठी लाखो रुपयांची आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. याशिवाय, अनेक नामांकित हंड्यांच्या ठिकाणी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय कलाकारांची खास उपस्थिती हे यंदाच्या उत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

जांभोरी मैदानावरील दहीहंडीला मुख्यमंत्र्यांनी भेट देत गोविंदांच्या उत्साहात सहभागी होत त्यांना दहीहंडीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच ठाण्यात आमदार प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित भव्य दहीहंडी उत्सवात 'आर्यन्स गोविंदा पथका'ने तब्बल १० थर रचून जागतिक विक्रमाचा प्रयत्न केला. १० थर यशस्वीरीत्या रचले गेले; मात्र १० वा गोविंदा पूर्ण उभा राहण्यापूर्वीच सर्व थर कोसळले. मुंबईतील घाटकोपर येथे मनसे नेते गणेश चुक्कल यांच्या वतीने आयोजित दहीहंडी उत्सवात एक थरारक घटना घडली आहे. अंधेरी पूर्व येथील 'अखिल मालपा डोंगरी' गोविंदा पथकाने यंदाच्या मोसमातील मुंबईतील पहिले ९ थर यशस्वीरीत्या उभारण्याचा विक्रम रचला; मात्र ९ वा थर उतरत असताना वरचा गोविंदा तोल जाऊन खाली कोसळला.





### मुंबईत दहीहंडी उत्सवाला गालबोट

मुंबई महापालिका प्रशासनाने दहीहंडी उत्सवादरम्यान जखमी झालेल्या गोविंदांची रुग्णालयातील आकडेवारी जाहीर केली आहे. प्रशासनाने ५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंतची माहिती दिली. विविध सरकारी आणि पालिका रुग्णालयांमध्ये एकूण २२ गोविंदा जखमी झाले आहेत. यापैकी २१ जणांना उपचारानंतर डिस्चार्ज देण्यात आला आहे.

### मागाठाण्यात कलाकारांची हजेरी

मागाठाणे गोविंदा महोत्सवाने यंदा २३ वर्षांची गौरवशाली परंपरा पूर्ण केली असून, मुंबईतील सर्वात मोठी आणि मानाची दहीहंडी म्हणून हा उत्सव अत्यंत उत्साहात साजरा होत आहे. यंदाही या महोत्सवाची भव्यता कायम राखत प्रसिद्ध कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम आणि राजकीय-सामाजिक मान्यवरांची विशेष उपस्थिती हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरणार आहे.



# 1,984 गणेश मंडळांवर पोलिसांची नजर!

## अकोल्यात 'एक मंडळ, एक कॉन्स्टेबल' अभिनव पोलिसिंग

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**अकोला :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्हा पोलीस प्रशासनाने कडक बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. जिल्ह्यात तब्बल १ हजार ९८४ गणेश मंडळे, तर शहरी भागात ७४० गणेश मंडळे असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अर्जित चांडक यांनी दिली. प्रत्येक गणेश मंडपावर पोलिसांची नजर राहावी यासाठी 'एक मंडप, एक कॉन्स्टेबल' अशी व्यवस्था करण्यात येणार आहे.गणेश मंडळांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी नियुक्त पोलीस कर्मचारी मंडळांशी समन्वय साधणार आहेत. दरम्यान, डीजेच्या आवाजाबाबतही पोलिसांनी स्पष्ट भूमिका घेतली असून ७५ ते ८० डेसिबलच्या मर्यादेत डीजेला प्राप्त अर्जानंतर परवानगी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

मात्र, निर्धारित डेसिबल मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या डीजे पथकांना प्रथम इशारा देण्यात येणार आहे. त्यानंतरही नियमांचे उल्लंघन सुरू राहिल्यास संबंधित डीजे पथकावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. डीजेचा आवाज मोजणार, मग वर्गणीचा हिशेब कोण मोजणार ?पोलिस प्रशासनाने डीजेच्या आवाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्पष्ट नियम आखले आहे. गणेशोत्सवाच्या काळात डीजेच्या आवाजाची डेसिबल मर्यादा तपासण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. मात्र, वर्गणी संकलनाची परवानगी आणि त्यातील पारदर्शकता तपासण्यासाठी कोणती यंत्रणा काम करणार, हा प्रश्न कायम आहे. डीजेचा आवाज मोजला जाणार आहे.



### डिजेसाठी अर्ज मगच परवानगी

पोलीस प्रशासनाच्या वतीने सांगायचे तर, एकूण आतापर्यंत १९८४ गणेश मंडळे (पूर्ण अकोला जिल्ह्यात) असणार आहेत, त्यापैकी ७४० मंडळे शहरामध्ये आहेत. आमची पूर्ण तयारी झालेली आहे. सुरक्षेसाठी २५०२ पोलीस अधिकारी व कर्मचारी बंदोबस्तात तैनात असणार आहेत. याशिवाय एस आर पी एफ चे बल, होमगार्ड, क्यु आर टी, स्ट्रायकिंग फोर्स आणि आर सी पी देखील सोबत असतील. यावर्षी आम्ही 'एक मंडळ, एक कॉन्स्टेबल' ही योजना राबवणार आहोत. प्रत्येक गणेश मंडळासाठी एक कॉन्स्टेबल नियुक्त केला जाईल, जो त्यांच्या परवानग्या व इतर अडचणी सोडवण्यास मदत करेल. तसेच दामिनी पथक, वॉच टॉवर्स, पीए सिस्टीम आणि दंगल नियंत्रण पथक सज्ज आहेत. सर्वांना एकच विनंती आहे की विसर्जन किंवा इतर दिवशी कोणतेही आक्षेपार्ह बॅनर, पोस्ट किंवा घोषणाबाजी करू नये. ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे (डेसिबल मर्यादा) तंतोतंत पालन करावे.काही अडचण आल्यास ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा; ५ ते ७ मिनिटांत मदत पोहोचेल. डिजे साठी पोलिसांकडे अर्ज करावा लागेल. त्यांच्या मंजुरीनंतर ७५ ते ८० डेसिबलपर्यंत परवानगी दिली जाईल. नियमांचे उल्लंघन झाल्यास प्रथम वॉर्निंग (इशारा) दिला जाईल; त्यानंतरही न ऐकल्यास १०० टक्के कायदेशीर कारवाई केली जाईल.'

- अर्चित चांडक, पोलिस अधीक्षक,अकोला.

# राज्यांतील न्यायाधिशांचे निवृत्तीचे वय 60 वरून 62 वर्षे!

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधिशांबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रासह छत्तीसगड, कर्नाटक, मध्य प्रदेश, सिक्कीम, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या ७ राज्यांमध्ये न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी संबंधित राज्यांनी त्यांच्या नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. देशातील जिल्हा न्यायालयांमध्ये तब्बल ५.१८ कोटी खटले प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यानंतर भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निर्णय घेतला. खंडपीठाने १ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशात संबंधित राज्य सरकारांना त्यांच्या सेवा नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश दिले.



हा आदेश शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झाला. मात्र ज्या राज्यांना हा आदेश मान्य नाही त्यांच्यासाठी पुढील सुनावणी १ ऑक्टोबर रोजी होणार आहे. दरम्यान, या निर्णयामुळे संबंधित सात राज्यांतील न्याय व्यवस्थेला काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, सेवा वाढविताना गुणवत्तेचे आणि कार्यक्षमतेचे निकष काटेकोरपणे पाळण्याची जबाबदारी संबंधित उच्च न्यायालयांवर राहणार आहे.

# पुण्यात डीजे अंगावर पडून महिलेचा मृत्यू

**पुणे :** पुण्यामध्ये डीजेला विरोध होत असताना दुसरीकडे पिंपरी-चिंचवडमध्ये याच डीजेने एका महिलेचा बळी घेतला आहे. डीजे अंगावर पडून ४५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. पिंपरी-चिंचवडच्या जुनी सांगवी परिसरात ही घटना घडली. या महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवडमध्ये खळबळ उडाली आहे. ऐन उत्सवात महिलेचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवडच्या जुनी सांगवी परिसरात दहीहंडीच्या कार्यक्रमासाठी डीजेचा रॅक उभारण्यात येत होता. हा रॅक अचानक कोसळला. यामधील डीजे एका महिलेच्या अंगावर पडला. तिला तात्काळ उपचारासाठी औंध जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात सध्या तणावाचे वातावरण आहे.

# मानसिक आजाराशी झुंजणाऱ्या तरुणीवर अत्याचार!

## गर्भवती राहिल्यानंतर प्रकार उघड

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**महागाव (यवतमाळ) :** मानसिक आजाराशी झुंज देत असलेल्या २९ वर्षीय तरुणीच्या असहायतेचा गैरफायदा घेत अज्ञात व्यक्तीने तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना महागाव तालुक्यात उघडकीस आली आहे. अत्याचारानंतर तरुणी गर्भवती राहिल्याचे निदर्शनास आल्यानंतर हा संतापजनक प्रकार कुटुंबीयांच्या लक्षात आला. या प्रकरणी महागाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पीडित तरुणी गेल्या काही वर्षांपासून मानसिक आजाराने त्रस्त असून, तिच्यावर मानसोपचार तज्ज्ञांकडून उपचार सुरू होते. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे काही वर्षांपासून तिचे उपचार बंद असल्याचे कुटुंबीयांनी पोलिसांना सांगितले.



मानसिक स्थितीमुळे स्वतःचे संरक्षण करणे, आजूबाजूच्या परिस्थितीचे आकलन करणे तसेच आपल्यासोबत घडलेला प्रकार कोणाला सांगणे तिच्यासाठी कठीण होते. याच असहायतेचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने तिच्यावर अत्याचार केल्याचा संशय आहे. मात्र, पीडितेला हा प्रकार कोणालाही सांगता आला नाही. दरम्यान, ती गर्भवती असल्याचे कुटुंबीयांच्या निदर्शनास आल्यानंतर घटनेचा उलगडा झाला. प्रकार समोर येताच कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. पीडितेला प्रथम सवना येथील आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले.

# मनोज जरांगे पाटलांनी पाणी, सलाईन अन् उपचार केले बंद!

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**जालना :** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाचा आज आठवा दिवस आहे. मराठा आंदोलकांनी काल रात्रीपासूनच उपोषणस्थळी मोठ्या संख्येने गर्दी केली असून, राज्यभरातील विविध भागांतून आंदोलक अंतरवली सराटीमध्ये पोहोचले आहेत. आता जरांगे पाटील यांनी रात्रीपासून पुन्हा उपचार घेणे बंद केले आहे. त्यांच्या या निर्णयाने अनेक मराठा आंदोलकांची चिंता वाढली आहे. काल रात्रीपासून मनोज जरांगे पाटील यांनी पाणी आणि सलाईनही बंद केली आहे. जोपर्यंत मागण्यांची अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत आता काहीही घेणार नसल्याचा पवित्रा त्यांनी घेतला आहे. मागण्या पूर्ण झाल्यानंतरच उपचार घेणार, असे त्यांनी स्पष्ट केले. उपचार बंद करण्याबाबत बोलताना ते म्हणाले की, सरकारने ५८ लाख नोंदी सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. पण अजूनही ते काम सुरू झालेले नाही. हैदराबाद गॅझेटच्या वैधतेबाबतही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. गावांमध्ये दवंड्या पिटण्याचे सांगितले होते, पण तेही केले गेले नाही. हैदराबाद गॅझेटनुसार वैधता देण्याबाबतही स्पष्टता नाही. २०१२ च्या जात पडताळणी कायद्यात मराठा समाजाचा समावेश करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटण्याचे आश्वासन शिष्टमंडळाने दिले होते. पण अजूनही शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटलेले नाही. यामुळे हैदराबाद गॅझेटच्या वैधतेचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. त्यामुळे जरांगे यांनी उपचार पुन्हा बंद केले आहेत.







# गुरु-शिष्यांच्या परंपरेचा महान उत्सव!

आई जशी मुलांवर संस्कार करते, तसा गुरु हा मुलांना घडवण्याचे, त्यांना सक्षम करण्याचे काम गुरु करतो. जीवनाला दिशा देण्यात आणि आपली जडणघडण करण्यात गुरुचा वाटा खूप मोठा असतो. त्यामुळे शिक्षक दिनाला भारतीय संस्कृतीत अधिक महत्त्व आहे.

`गुरु ब्रह्मा, गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात परब्रह्म तस्मैः श्री गुरुवेः नमः।` भारतीय संस्कृतीत आईनंतर सर्वांत महत्त्वाचे स्थान आहे ते गुरुला. आई जशी मुलांवर संस्कार करते, तसा गुरु हा मुलांना घडवण्याचे, त्यांना सक्षम करण्याचे काम गुरु करतो. जीवनाला दिशा देण्यात आणि आपली जडणघडण करण्यात गुरुचा वाटा खूप मोठा असतो. त्यामुळे शिक्षक दिनाला भारतीय संस्कृतीत अधिक महत्त्व आहे.

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणजेच, ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. शिक्षक दिनाच्या दिवशी विद्यार्थी आपल्या गुरुजनांबद्दल आदराची आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करतात. तसेच शिक्षकांच्या भूमिकेचे महत्त्व आणि भविष्यातील पिढ्यांच्या जागरुकतेसाठी हा दिवस साजरा केला जातो. मूळात शिक्षक दिनाची सुरुवात कशी झाली? जागतिक स्तरावर शिक्षक दिन कधी साजरा केला जातो.

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणजेच ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. राजकारणात त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. भारताचे उपराष्ट्रपती आणि राष्ट्रपती अशी दोन्ही पदे भूषविली असली, तरी शेवटपर्यंत आदर्श शिक्षकाची ओळख त्यांनी जपली. म्हणूनच त्यांच्या स्मरणार्थ ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. भारतामध्ये सर्वप्रथम सन १९६२ मध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. माझा जन्मदिवस शिक्षक दिनाच्या रुपात साजरा करणे माझ्यासाठी गौरवास्पद असेल, असे राधाकृष्णन यांनी सांगितल्याची आठवण सांगितली जाते.

शिक्षक दिनाच्या दिवशी देशभरातील शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळतो. विद्यार्थी आपल्या आवडत्या शिक्षकांना फुले, शुभेच्छा पत्रे देऊन आणि त्यांचा चरणस्पर्श करून आशीर्वाद घेतात. अनेक शाळांमध्ये मोठे विद्यार्थी स्वतः शिक्षक बनून लहान वर्गांना शिकवण्याचा आनंद घेतात आणि शिक्षकांचे जीवन किती जबाबदारीचे असते हे अनुभवतात. या दिवशी निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, चित्रकला आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याशिवाय, भारत सरकारतर्फे देशातील उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या शिक्षकांना राष्ट्रपतींच्या हस्ते 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारा'ने गौरवले जाते.

शिक्षक दिन हा केवळ वर्षातून एकदा सत्कार करण्याचा किंवा पुष्पगुच्छ देण्याचा दिवस नाही, तर त्यांनी शिकवलेल्या तत्त्वांचे आपल्या आयुष्यात आचरण करण्याचा दिवस आहे. आजच्या डिजिटल आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी त्या माहितीचे योग्य ज्ञानात रूपांतर करण्याचे आणि मूल्यांची जपणूक करण्याचे कार्य केवळ एक शिक्षकच करू शकतो. त्यामुळे आपल्या आयुष्याला आकार देणाऱ्या प्रत्येक गुरूचा आदर करणे आणि त्यांनी दाखवलेल्या सत्मार्गावर चालणे, हीच त्यांच्यासाठी खरी गुरुदक्षिणा ठरेल.

## आज शिक्षक दिन



### अशी आहे शिक्षक दिनाची कहाणी...

शिक्षक दिन ५ सप्टेंबर रोजीच साजरा करण्यामागे एक अत्यंत प्रेरक इतिहास आहे. हा दिवस भारताचे पहिले उपराष्ट्रपती, दुसरे राष्ट्रपती, थोर तत्त्वज्ञ आणि नामांकित शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती म्हणून ओळखला जातो. डॉ. राधाकृष्णन यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ रोजी झाला. १९६२ मध्ये जेव्हा ते भारताचे राष्ट्रपती बनले, तेव्हा त्यांच्या काही स्नेही आणि विद्यार्थ्यांनी त्यांचा वाढदिवस थाटामाटात साजरा करण्याची इच्छा व्यक्त केली. त्या वेळी अत्यंत विनम्र भावाने डॉ. राधाकृष्णन म्हणाले होते, 'माझा वाढदिवस वेगळा साजरा करण्याऐवजी, जर हा दिवस देशातील सर्व शिक्षकांच्या सन्मानासाठी आणि समर्पणासाठी साजरा केला गेला, तर मला त्याचा सर्वाधिक अभिमान वाटेल.' त्यांच्या या उदात्त विचारांचा मान राखून १९६२ सालापासून ५ सप्टेंबर हा दिवस अधिकृतपणे 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला.

### कोणत्या देशात केव्हा साजरा करतात शिक्षक दिन

युनेस्कोने ५ ऑक्टोबर हा दिवस आंतराराष्ट्रीय शिक्षक दिन म्हणून जाहीर केला आहे. रशियामध्ये १९६५ ते १९९४ पर्यंत ऑक्टोबर महिन्यातील पहिला रविवार शिक्षक दिन म्हणून साजरा केला जात होता. १९९४ सालापासून युनेस्कोच्या निर्णयानंतर त्यांनी ५ ऑक्टोबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून स्वीकारला. इंडोनेशिया, व्हिएतनाम देशात नोव्हेंबर महिन्यात, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान, ब्राझील, कॅनडा, चीली, जर्मनी यासारख्या देशात ऑक्टोबरमध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात येतो. साधरण २० व्या शतकापासून शिक्षक दिन साजरा करण्याची परंपरा जगभरात सुरू झाली. जागतिक स्तरावर वेगवेगळ्या दिवशी का होईना, पण हा दिवस साजरा करतात. चीनमध्ये १९३१ मध्ये 'नॅशनल सेन्ट्रल यूनिव्हर्सिटी'मध्ये शिक्षक दिनाची सुरुवात करण्यात आली. सन १९३९ मध्ये कन्फ्यूशिअसचा जन्मदिवस २७ ऑगस्ट हा दिवस शिक्षक दिन म्हणून घोषित करण्यात आला. मात्र, १९८५ मध्ये १० सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून त्याला मान्यता मिळाली.

# शिक्षक दिनी काळाच्या पडद्याआड गेलेले ज्ञानेश्वर ढेरे सर

माणसांच्या गर्दीत माणूस म्हणून जगणारी आणि आपल्या कर्तृत्वाने इतरांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणारी माणसे विरळाच असतात. अशीच एक प्रेमळ, मनमिळाऊ, शिस्तप्रिय आणि विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी आयुष्य वेचणारी व्यक्ती म्हणजे प्रा. ज्ञानेश्वर ढेरे सर. शिक्षक दिनाच्या पवित्र दिवशीच त्यांचे निधन होणे ही मुर्तीजापूरच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रासाठी अत्यंत वेदनादायी बाब ठरली. शिक्षकांचा गौरव करण्याचा दिवस असतानाच एका आदर्श शिक्षकाचे आपल्यातून निघून जाणे ही नियतीची विलक्षण शोकांतिका म्हणावी लागेल.



ज्ञानेश्वर ढेरे सर हे केवळ वर्गात धडे देणारे शिक्षक नव्हते, तर विद्यार्थ्यांच्या मनाला आकार देणारे आणि त्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे शिक्षक होते. शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून चांगला माणूस घडविण्याचे माध्यम आहे, हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून जपला. त्यांच्या संपर्कात आलेल्या असंख्य विद्यार्थ्यांच्या मनात आजही सरांविषयी आदर, आपुलकी आणि कृतज्ञतेची भावना कायम आहे.

राजकारण, समाजकारण आणि शैक्षणिक क्षेत्राशी त्यांचा जवळचा संबंध होता. मुर्तीजापूरच्या सार्वजनिक जीवनात काम करताना त्यांनी केवळ निवडणुकीपुरते किंवा राजकीय गणितापुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही. माणसे जोडणे, लोकांशी आपुलकीचे संबंध निर्माण करणे आणि समाजाच्या उपयोगी पडणे हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव होता. त्यांच्या कार्याची दखल घेताना अनेकांनी त्यांच्या साधेपणाचे आणि माणुसकीचे कौतुक केले.प्रा. ढेरे सरांनी आपल्या प्रदीर्घ शैक्षणिक कारकिर्दीत असंख्य विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच संस्कार दिले. शारीरिक शिक्षणाच्या क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. नोकरी सोडून संत गाडगे महाराज महाविद्यालयात शारीरिक शिक्षक म्हणून त्यांनी कार्याला सुरुवात केली. क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, जिद्द आणि नेतृत्वगुण निर्माण करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले अनेक विद्यार्थी पुढे विविध क्षेत्रांत यशस्वी झाले. क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांना संधी मिळावी, त्यांनी तालुका, जिल्हा तसेच राज्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली गुणवत्ता ओळखून तिला योग्य व्यासपीठ मिळवून देण्याचे काम त्यांनी केले.

सन १९९४ मध्ये श्री व्यंकटेश बालाजी शिक्षण संस्थेची स्थापना करण्यामागेही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. ग्रामीण आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी मिळावी, हा व्यापक दृष्टिकोन त्यांनी आपल्या कार्यातून जपला. या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडले आणि पुढे डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी तसेच विविध क्षेत्रांतील जबाबदार नागरिक म्हणून समाजात उभे राहिले. प्रा. ज्ञानेश्वर ढेरे यांच्या जीवनावर संत गाडगे महाराजांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. त्यांचे वडील गोविंदराव ढेरे हे शेतकरी होते. गाडगेबाबांच्या विचारांनी प्रभावित होऊन समाजसेवेची प्रेरणा कुटुंबाला मिळाली आणि त्याच विचारांची छाप ज्ञानेश्वर ढेरे सरांच्या जीवनावरही उमटली. ५ सप्टेंबर हा दिवस देशभरात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थी आपल्या गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त करतात, शिक्षकांचा सन्मान केला जातो. मात्र याच दिवशी प्रा. ज्ञानेश्वर ढेरे सरांनी जगाचा निरोप घेणे हा त्यांच्या कुटुंबीयांसह हजारो विद्यार्थ्यांसाठी आणि मुर्तीजापूरकरांसाठी अत्यंत भावनिक क्षण ठरला.

ज्या दिवशी शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला जातो, त्याच दिवशी एका आदर्श शिक्षकाचे निधन होणे हा नियतीचा अत्यंत हृदयस्पर्शी योगायोग म्हणावा लागेल. सर आज देहाने आपल्यात नसले तरी त्यांनी घडविलेल्या विद्यार्थ्यांच्या रूपाने, त्यांनी उभ्या केलेल्या शैक्षणिक कार्याच्या रूपाने आणि त्यांनी जपलेल्या माणुसकीच्या मूल्यांच्या रूपाने ते कायम आपल्यातच राहतील. आज त्यांच्या आठवणींना उजाळा देताना मुर्तीजापूर शहराला जाणवते आहे की, एक व्यक्ती गेली असली तरी तिचे कार्य कधीच मरत नाही. त्यांनी जोडलेली माणसे, घडविलेले विद्यार्थी, उभ्या केलेल्या संस्था आणि समाजासाठी दिलेले योगदान हीच त्यांच्या जीवनाची खरी ओळख आहे.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने त्यांचे स्मरण म्हणजे केवळ एका दिवंगत शिक्षकाला श्रद्धांजली नव्हे, तर शिक्षण, संस्कार, क्रीडा आणि माणुसकीसाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या एका कर्मयोग्याला मानाचा मुजरा आहे. प्रा. ज्ञानेश्वर ढेरे सर आपल्यातून निघून गेले; मात्र त्यांच्या कार्याचा सुगंध आणि त्यांनी घडविलेल्या पिढ्यांच्या मनातील त्यांची आठवण काळाच्या ओघात कधीही पुसली जाणार नाही. प्रा. ज्ञानेश्वर ढेरे सर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

अनवर खान
मूर्तिजापूर 9767774727

# डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या मते शिक्षक स्वप्नांना पंख देणारे

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या मते शिक्षक दिन हा केवळ औपचारिक सत्कार करण्याचा दिवस नसून, राष्ट्र उभारणीत शिक्षकांच्या योगदानाची आठवण ठेवण्याचा आणि त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. वैज्ञानिक आणि राष्ट्रपती म्हणून जगात नावाजले गेले असले, तरी कलाम स्वतःला नेहमी "शिक्षक" मानणेच पसंत करत.

डॉ. कलाम यांच्या मते, देश भ्रष्टाचारमुक्त आणि सुसंस्कृत बनवायचा असेल, तर तीनच घटक ते करू शकतात - आई, वडील आणि शिक्षक. शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये आणि विचारसरणी रुजवतात. ज्ञानाचे दीपस्तंभ शिक्षक आहेत. शिक्षक केवळ पाठ्यपुस्तकातील माहिती शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांना विचार करायला, प्रश्न विचारायला आणि नवनवीन शोध लावायला शिकवतात.



**स्वप्नांना पंख देणारे मार्गदर्शक :** कलाम नेहमी सांगत की, शिक्षकाचे काम विद्यार्थ्यांच्या मनातील सुप्त गुणांना ओळखून त्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा देणे हे आहे.

**शिक्षकाचे सर्वोच्च स्थान:** राष्ट्रपतीपद भूषवल्यानंतरही कलाम यांनी आपले उर्वरित आयुष्य विद्यार्थ्यांना शिकवण्यात घालवले. २७ जुलै २०१५ रोजी शिलाँग येथील IIM मध्ये विद्यार्थ्यांना संबोधित करत असतानाच त्यांनी अंतिम श्वास घेतला. "लोक मला एक उत्तम शिक्षक म्हणून ओळखतील, तोच माझ्यासाठी सर्वात मोठा सन्मान असेल," असे ते मानत.

शिक्षक दिन हा शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि देशाचे भविष्य घडवणाऱ्या या पेशाला सलाम करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना विद्यार्थ्यांमध्ये रमायला आवडायचे. कारण विद्यार्थी देशाचे आधारस्तंभ आहेत असा त्यांना विश्वास होता.

डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांचे विद्यार्थ्यांसाठी पाच महत्त्वाचे संदेश प्रेरणादायी आहे.

**मोठे स्वप्न पहा :** स्वप्न ते नसतात जे तुम्ही झोपेत पाहता, स्वप्न ती असतात जी तुम्हाला झोपू देत नाहीत. त्यामुळे नेहमी मोठी उद्दिष्टे ठेवा.

कठिण परिश्रम: यशासाठी कोणताही सोपा मार्ग नसतो. सतत प्रयत्न आणि प्रामाणिक कष्ट हेच ध्येयप्राप्तीचे मूळ साधन आहे.

ज्ञान मिळवा: ज्ञान तुम्हाला महान बनवते. सतत काहीतरी नवीन शिकण्याची वृत्ती ठेवा; ज्ञान हे महानता, निर्मिती आणि धैर्याचा पाया आहे.

**चिकाटी आणि हार न मानणे:** समस्यांना घाबरू नका. अडचणींना तुमचे नियंत्रण करू देण्याऐवजी, तुम्ही अडचणींवर मात करून विजय मिळवा.

स्वतःवर विश्वास ठेवा: स्वतःच्या क्षमतेवर आणि ध्येयावर पूर्ण विश्वास ठेवा. इतरांपेक्षा वेगळे दिसण्याचे आणि स्वतःची ओळख निर्माण करण्याचे धाडस बाळगा.

# शिक्षक की सर ? कागदी कारभारात हरवलेला राष्ट्रनिर्माता

"शिक्षण हेच आमचं मूळ काम..." हा संदेश फळ्यावर लिहिलेला असताना, प्रत्यक्ष वर्गात मात्र शिक्षकाच्या हातात खडूऐवजी डेटा एंट्रीच्या फायली, बीएलओची कामे, मतदार कार्ड लिंक करणे आणि एस आय आर यांसारख्या बिगर-शैक्षणिक कामांचे ओझे दिले जात आहे. 'शिक्षक घडवतो भविष्य, पण आज शिक्षकाचा वर्तमानच अंधारात' अशी विदारक परिस्थिती आज संपूर्ण राज्यभरात निर्माण झाली आहे.

**शासकीय कामे की शिक्षणाची गळचेपी?:** एकीकडे परीक्षा तोंडावर आल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाचा ताण आहे, तर दुसरीकडे शिक्षकांना शाळा सांभाळून 'नो लिंकेज' चे मेसेज, सुनावणी आणि डेटा एंट्रीचे पेन्शन सहन करावे लागत आहे. वर्गखोल्यांमध्ये लेकरं गुरुजींची वाट पाहत बसली आहेत आणि गुरुजी मात्र दरोदारी फिरून मतदार गणना प्रपत्रे भरण्यात व्यस्त आहेत.



**कामाचा अतिरिक्त ताण:** बीएलओचे काम, डेटा एंट्री, आणि शासकीय सुनावणीमुळे शिक्षकांचा स्वाभिमान आणि धाक दोन्ही धोक्यात आले आहेत.

**विद्यार्थ्यांचे नुकसान:** पालकांचे मतदार कार्ड तर लिंक झाले, पण विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे काय? शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याची वाट लागत आहे.

**शिक्षकांवरच सर्व खापर:** प्रशासनाचा दबाव सहन करत काम करायचे आणि त्यात काही चूक झाल्यास बोट मात्र शिक्षकावरच दाखवायचे, असा प्रकार सुरू आहे.

**शासनाची भूमिका आणि मुख्य प्रश्न :** भारताचा विकास शिक्षकांच्या हाती आहे असे गोड बोल लावले जातात, पण प्रत्यक्षात मात्र शिक्षकांची प्रशासकीय कामांत माती केली जात आहे. "शाळा सांभाळू की शासकीय काम करू? कुणीतरी सांगा राव... आम्ही लेकरं कशी शिकवू?" हा आर्त हाक आज महाराष्ट्रातील प्रत्येक शिक्षकाच्या मनात आहे. शासनाने आणि शिक्षण विभागाने वेळीच गांभीर्याने विचार करून शिक्षकांना या बिगर-शैक्षणिक आणि ऑनलाइन कामांच्या कचाट्यातून मुक्त करणे गरजेचे आहे. जर शिक्षकच वर्गात नसेल, तर देशाचे भविष्य घडणार कसे?

प्रा. प्रज्ञानंद थोरात
मो. 9822674487

### शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे नाते दृढ करणारा दिवस

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचा अत्यंत महत्त्वाचा वाटा असतो. म्हणूनच शिक्षकांना गुरूची उपमा दिली आहे. ५ सप्टेंबर हा शिक्षकांच्या सन्मानाचा दिवस आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते दृढ करणारा हा दिवस. शिक्षक दिनानिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. शिक्षक दिनाचे महत्त्व त्यातून अधोरेखित होते. सुसंस्कारित पिढी घडविण्यासाठी शिक्षक योगदान देतात. अगदी पूर्वापार ही परंपरा आपल्या देशात जोपासली जात आहे.

# जमीन, हवा, पाणी शुद्धतेशिवाय पर्याय नाही

या विकसित नैसर्गिक उत्प्रेरक पाण्यात टाकल्यावर पाणी "गंगाजला" सारखे होते. पाण्यात मच्छराची मादी अंडी घालू शकत नाही, शेवाळ तयार होत नाही, अन्न पूर्णपणे शिजते. पिण्यास आनंद मिळतो, इ. अनेक उपयोग जसे गंगाजलामध्ये आहेत तसेच या जैविक पाण्याचे पण आहेत. पाण्यातील मुख्य दोष दूर झाल्याने सर्व प्राणीमात्रांची रोग प्रतिकार शक्ती वाढते. पूर्वी भारतात सर्व नद्यांमधून बायोसॅनिटाईज्ड पाणीच वाहत होते व त्यामुळेच आम्हाला कोणत्याही प्रकारचे रोग होत नसे. याद्वारे सेंद्रिय शेती गतीने तयार होऊन उत्तम अन्न तयार होत आहे. परदेशात रसायनमुक्त जास्त भाव देऊन पाठविण्यात येत आहे. रोग, कीड नसलेले फळ, धान्य, फुले मिळतात आणि त्यांची चवही जास्त चांगली असते हे विशेषत्वाने नमूद करीत आहे.

पाण्याचे फायदे :-पाणी जिवंत होते. पाण्यात मच्छरांची अंडी तयार होत नाहीत. पाण्यात शेवाळ तयार होत नाही. पाण्यातील क्षार कमी होतात. क्षार वेगळे करण्यासाठी वेगळी प्रक्रिया करावी लागत नाही. पाण्याच्या शुद्धीकरणासाठी विद्युत किंवा इतर यंत्रांची आवश्यकता नाही. रोग प्रतिकारशक्ती वाढते, केस चिकट होत नाहीत. भांड्यांवर क्षार जमा होत नाहीत. अन्न पदार्थ उत्तम शिजतात.

**हवेची शुद्धता :-** वाहनांच्या टँकमध्ये या उत्प्रेरकाला टाकल्यास यातून ऑक्सिजन या पदार्थाला मिळाल्यामुळे गाड्यांच्या मायलेजमध्ये १०-२० टक्क्यांपर्यंत वाढ होते व या गाड्यांमधून निघणाऱ्या धुरातून कार्बन डायऑक्साईड व नायट्रेट्सचे प्रमाण कमी होते व त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगवर मात करता येते. हवेतील प्रदूषण मुख्यत्वे करून या गाड्यांमुळे होत आहे. जर बायोसॅनिटायझरचे ग्रॅन्युअल्स वापरले तर या पद्धतीच्या प्रदूषणावर मात करता येईल. पूर्वी गाड्यांचे प्रमाण कमी असल्याने निसर्गातील समृद्धी यावर मात करत असे, त्यामुळे मानवाला याचा त्रास होत नव्हता. परंतु दिवसेंदिवस गाड्यांची संख्या वाढल्याने (प्रचंड) ग्लोबल वॉर्मिंगचा अनुभव आम्ही अनुभवून राहिलो आहे.

त्याचप्रमाणे सॅनिटेशनमध्ये या पाण्याचे फवारे केल्याने सॅनिटेशनमधील दुर्गंधीयुक्त वासावर नियंत्रण मिळविता येते. घरात हे पाणी शिंपडल्याने घरातील अनेक प्रकारचे कृमी, कीटक, मच्छर येत नाहीत. औद्योगिकीकरणाने होणाऱ्या प्रदूषणावर मात करता येते. औद्योगिकीकरणाचे पाणी शुद्धतेच्या प्रकल्पावरील खर्चाची बचत करता येते. उत्प्रेरक (कॅटालिस्ट) असल्याने वारंवार वापरायची गरज नाही. प्रदूषित झालेल्या पाण्याला शुद्ध करून नदीत सोडता येते, त्यामुळे नदीचे पण शुद्धीकरणास सुरुवात होते.

औद्योगिक, पेट्रोजन्य व स्वच्छतेचे फायदे :-

गाडीच्या टँकमध्ये वापरल्याने गाडीचा मायलेज वाढतो व मेंटेनन्स कमी होतो. गाडीतून निघणारा धूर कमी होतो व पर्यावरणास कमी नुकसान होते. उद्योगात वापरल्याने रसायनांमुळे होणारे दुष्परिणाम टाळता येतात. उद्योगामुळे होणारे पाण्याचे व जमिनीचे प्रदूषण नैसर्गिकरीत्या विघटित होऊन कमी होते. पाण्याचा वापर हा शुद्धीकरणाचे चक्र तयार करण्यासाठी होतो. पाण्याची दुर्गंधी व त्यातून पसरणारे रोग कमी होतात. पाण्याच्या वापरामुळे मानवनिर्मित जैविक कचरा खतात सहजतेने




रूपांतरित करता येतो. वीज निर्मिती आणि इंधनावरील खर्च कमी करता येतो.

**जमिनीची शुद्धता :** -शेतीचे प्रदूषण कमी करता येते. शेतीत याचा वापर करता येतो. शेतातील विहिरीत, बोअरवेलमध्ये, जलाशयांमध्ये पाण्याचे फवारे यामधून वापर केल्याने जे पाणी अशुद्ध झाले आहे ते पाणी शुद्ध होते. त्याद्वारे शेतातील जमिनीत साधारणतः एक ते दीड वर्षात जमिनीची पूर्णपणे सुधारणा होऊन जमिनीचे पर्यावरण सुधारल्याने अनेक जीवजंतू व 'फेरीटेमा इलोंगेटा' नावाचा पांढरा गांडूळ तयार होतो ज्याला 'मदर कल्चर' संबोधले जाते. हा गांडूळ जमिनीत ३-४ मीटर खोलपर्यंत असतो. याचे अन्न मुरूम व माती असल्याने तो तेथे सतत सक्रिय असतो. हा गांडूळ सतत जमीन उकरून पचनसंस्थारे आपली विष्ठा पुन्हा जमिनीवर सोडतो. ही विष्ठा शेतातील पिकाच्या वाढीसाठी अतिशय महत्वाचे अन्नघटक म्हणून कार्य करते. ही विष्ठा म्हणजेच पिकासाठीचे सेंद्रिय/नैसर्गिक खतच होते. बायोसॅनिटायझरच्या पाण्यामुळे जमिनीची क्षारता कमी होते. गांडुळे जमिनीत तयार झाल्याने नैसर्गिकरीत्या पावसाचे पाणी मुरायला लागते, त्यामुळे पाण्याची समस्या पूर्णपणे सुटते. त्यामुळे कोणत्याही प्रकारची वेगळी फवारणी व त्यासाठीचा खर्च करावा लागत नाही. शेतकरी सुखी होतो. शेती सेंद्रिय झाल्यामुळे उत्तम प्रतीचे उत्पादन होते. ही अतिशय महत्वाची बाब आहे.

**जमिनीचे फायदे :** जमीन तीव्र गतीने सेंद्रिय होते. शेतजमीन सुपीक व मऊ होते. जमिनीत गांडुळे व विविध जैविक संपदा निर्माण होते. पाणी नैसर्गिकरीत्या जमिनीत मुरते व ओलावा निर्माण होतो. जमिनीची पत सुधारते व त्याला वेगळ्या प्रक्रियेची आवश्यकता नाही. पिकांच्या वाढीला मदत होऊन निरोगी पीक निर्माण झाल्याने जास्त दिवस अन्नपदार्थ टिकतात. पिकांवर सहजपणे कुठलाही रोग आक्रमण करू शकत नाही, मशागतीचा खर्च कमी होतो. जमिनीला एकसारखे करण्यासाठी ट्रॅक्टरची गरज पडत नाही. असे निर्माण झालेले पीक निर्यातीत प्राधान्यक्रमावर असते.

वरील विश्लेषणावरून असे लक्षात येते की, एकंदरच पाणी, जमीन, हवा हे सर्व प्रदूषित झाले आहे. जोपर्यंत निसर्गाची ताकद या घटकांना सांभाळण्याची होती तोपर्यंत सर्व प्राणीमात्रांना या प्रदूषणाचा त्रास झाला नाही. परंतु जसे जसे हे घटक प्रदूषित व्हायला लागले तसतसे मानवास त्रास होऊ लागला. या प्रकारच्या बायोसॅनिटायझरचा उपयोग करून अमरावती, नागपूर, नाशिक, निफाड, पुणे, मुंबई, कलकत्ता आदी शहर तसेच तमिळनाडू, आसाम, गुजरात व अनेक राज्यांमध्ये आणि परदेशात देखील करण्यात येत आहे. पूर्वी वरील सर्व घटक उत्तम होते म्हणूनच पृथ्वीवर मानवाचा जन्म झाला. याचा अर्थ पृथ्वीवरील पर्यावरण उत्तम होते. परंतु मानवाच्याच उपभोगवादामुळे या निसर्गाचे शोषण होऊन आजची भीषण परिस्थिती निर्माण झाली. यावर बुद्धिमान मानवच मात करू शकतो आणि ती पूर्ण करण्याची ताकद या नवीन संशोधनात आहे, ज्याचे रूपांतरण एका नैसर्गिक उत्प्रेरक 'बायोसॅनिटायझर' मध्ये आहे.

बायोसॅनिटायझर ज्यामुळे पुन्हा हवा, पाणी व जमीन शुद्ध होईल. त्यामुळे आजच्या वातावरणात असलेले व्हायरस कमी होतील व पुनः एकदा सुजलाम् सुफलाम् भारत पुढच्या पिढीच्या हातात देऊन त्यांचे जीवन नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध करू असा विश्वास वाटतो.

**विशेष :** १. या संशोधनाला जागतिक दर्जाचे २ यूएस (US) व ३ भारताचं पेटेंट मिळालेले आहे. २. या संशोधनाला भारत सरकार तर्फे नॅशनल अर्बन वॉटर ट्रीटमेंट साठी नॅशनल अवॉर्ड २००९ मिळालेला आहे. ३. या संशोधनाला Bry-Air Awards for Excellence in HVAC&R प्रॉडक्ट कॅटेगरी मध्ये देण्यात आला .

४. या संशोधनाला IWWA (Indian Water Works Association) चा अवॉर्ड २००६ मध्ये मिळालेला आहे.

समाप्त

प्रा. अरविंद बा. कडबे
अध्यक्ष ओलावा फॉउंडेशन
मो. : ९४२२११२४२०

# गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करा

## जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे आवाहन

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**अकोला :** आगामी गणेशोत्सवात सर्व स्तरातील समाज घटकांनी सौहार्दपणे सहभागी होऊन शांतता व उत्साहाच्या वातावरणात व पर्यावरणपूरक साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे केले. तसेच या उत्सवासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना लागणाऱ्या विविध परवानग्यांसाठी एक खिडकी सुविधा उपलब्ध करावी, असे निर्देशही त्यांनी महापालिका व पोलीस यंत्रणांना दिले.

गणेशोत्सव संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात बैठक पार पडली. या बैठकीस आमदार वसंत खंडेलवाल, आमदार साजिदखान पठाण, ॲड. मोतीसिंग मोहता, पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, महापालिका आयुक्त सुनील लहाने, अपर पोलीस अधिक्षक चंद्रशेखर रेड्डी, सिध्दार्थ शर्मा, धर्मादाय आयुक्त चौधरी, तसेच गणेशोत्सव मंडळांचे सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी मीना म्हणाल्या, जिल्ह्यात नोंदणीनुसार सुमारे 1 हजार 984 मोठे व लहान गणेश मंडळे आहेत. उत्सव काळात कायदे व सुव्यवस्था राखतानाच भाविकांसाठी सर्व आवश्यक सुविधा संबंधित विभागांनी उपलब्ध करुन द्याव्यात. महापालिका प्रशासनाने मिरवणूक व विसर्जन विनाअडथळा होण्याच्या दृष्टीने रस्त्यांचे खड्डे बुजविण्याचे कार्य प्राधान्याने पूर्ण करावे. तसेच पथदिव्यांची दुरुस्ती करुन घ्यावी.गणेश मंडळांना आवश्यक परवानग्या सुलभरित्या प्राप्त होण्यासाठी एक खिडकी योजना प्रभावीपणे राबवावी. त्यासाठी संबंधित विभागांनी एक नोडल अधिकारी, कर्मचारी नियुक्त करावेत. विद्युत विभागाने सुध्दा लोंबकळलेल्या वीजतारा सुरळीत कराव्यात, तसेच गणेश मंडळाना गणेशोत्सव कालावधीत वीज पुरवठा सुरळीतरित्या मिळण्यासाठीची जपरवानगी द्यावी. गणेशमूर्ती विक्रीचे नियोजन, गणेश आगमन व विसर्जन मिरवणूक मार्ग रहदारी व्यवस्थापन, गणेश मूर्ती उंची, उच्च ध्वनी मर्यादा पालन याबाबत काटेकोरपालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.मंडळांनी ध्वनीमर्यादेचे कटाक्षाने पालन करावे. पारंपरिक वाद्यांचा वापर व्हावा. स्थापना ते विसर्जन या कालावधीत गणेश मंडळांना कोणतीही अडचण येणार नाही यासाठी पोलीस विभाग सज्ज व दक्ष आहे, असे पोलीस अधीक्षक श्री. चांडक यांनी सांगितले. गणेशोत्सव शांतता व सौहार्दाच्या वातावरणात पार पाडावा व त्यासाठी सर्व मंडळांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. महानगरपालिकेतर्फे घरगुती गणेश विसर्जनासाठी चार ठिकाणी घाटांची निर्मिती केली जाईल. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व रस्त्यांचे खड्डे बुजविण्याचे कार्य लवकर पूर्ण करण्यात येईल. तसेच पथदिव्यांची दुरुस्तीही करण्यात येईल. गणेश मंडळांना आवश्यक परवानग्या सुलभरित्या प्राप्त होण्यासाठी एक खिडकी योजना सुरु करण्यात आली आहे.

श्री गणेश मिरवणूक व विसर्जनाच्या कालावधीत शहरात गणेश विसर्जनासाठी टँक तयार करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी 4 फुटापर्यंत गणपतींचे विसर्जन करता येईल. तसेच मोठ्या मूर्तीविसर्जनाची सुविधा बाळापूर येथील नदी घाटावर असेल.

# बोगस बियाण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्या

## आ. हरीश पिंपळे यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघासह अकोला तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना यंदाच्या खरीप हंगामात बोगस व अप्रमाणित बियाण्यांमुळे मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. सोयाबीन, कापूस, तूर तसेच इतर खरीप पिकांच्या उगवणीवर परिणाम झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची शक्यता आहे. या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत व भरपाई देण्यात यावी, अशी मागणी आमदार हरीश मारोतीआप्पा पिंपळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आमदार पिंपळे यांच्या निवेदनानुसार, यंदा खरीप हंगामातील पिकांच्या उगवणीच्या काळात अनेक शेतकऱ्यांनी बाजारातून बियाणे खरेदी करून पेरणी केली. मात्र, अपेक्षित उगवण न झाल्याने अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. काही ठिकाणी पिकांची वाढ अत्यल्प झाली असून, काही शेतांमध्ये पिके समाधानकारक न आल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मूर्तिजापूर व बार्शिटाकळी तालुक्यासह अकोला तालुक्यातील काही भागात खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांवर बियाण्यांच्या निकृष्टतेचा परिणाम झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी केली; मात्र पिकांची अपेक्षित उगवण न झाल्याने त्यांच्यावर पुन्हा पेरणीचा आर्थिक भार पडला आहे.

पेरणीसाठी केलेला खर्च, मशागतीचा खर्च, बियाणे, खत तसेच मजुरीचा खर्च यामुळे आधीच शेतकरी आर्थिक अडचणीत आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळण्याची शक्यता कमी झाली असून त्यांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे. नुकसानीचे मूल्यांकन केवळ कागदोपत्री किंवा अंदाजाच्या आधारे न करता प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पाहणी व सर्वेक्षण करण्यात यावे, अशी स्पष्ट मागणी आमदार पिंपळे यांनी केली आहे. संबंधित कृषी विभाग, महसूल विभाग आणि विमा यंत्रणेने संयुक्तपणे नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून प्रत्येक शेतकऱ्याच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

तसेच बोगस अथवा अप्रमाणित बियाण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे स्वतंत्र सर्वेक्षण करून संबंधित बियाणे उत्पादक व विक्रेत्यांची चौकशी करावी. दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तातडीने आर्थिक मदत व पीकविमा भरपाई द्यावी.दोषी बियाणे कंपन्यांवर कारवाईची मागणी आहे.

बोगस अथवा अप्रमाणित बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्यास संबंधित बियाणे उत्पादक व विक्रेत्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे मिळणे ही संबंधित यंत्रणेची जबाबदारी असून, भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी प्रभावी नियंत्रण व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला यांनाही देण्यात आल्या आहेत.

# राहुल गांधी यांच्यावरील एफआयआर रद्द करण्याची मागणी



## निवेदन देण्यासाठी काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**अकोला :** लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेली एफआयआर रद्द करून, उत्तराखंडमधील भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या शुद्धीकरणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागणीसाठी शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देशाच्या राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले.

उत्तराखंडमधील हल्द्वानी येथे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सभेनंतर भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी सभास्थळाचे शुद्धीकरण केले होते. या घटनेच्या निषेधार्थ लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत दोषींवर कठोर कारवाई करून त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र, द्वेषभावनेतून भाजप कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्याविरोधातच हल्द्वानी शहर कोतवाली पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केला. एफआयआर रद्द करून सभास्थळाचे शुद्धीकरण करणाऱ्या भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांवर एफआयआर दाखल करण्यात यावा, या मागणीसाठी शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी शहर काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नैसर्गिक शेतीकडे वळण्याचे शेतकऱ्यांना आवाहन




प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**मुर्तीजापूर :** तालुका शेतकरी सल्लागार समितीच्या अध्यक्ष सौ. शामल भूषण कोकाटे यांच्या संकल्पनेतून शुक्रवारी मौजे जीतापूर खेळकर येथे तूर पिकासाठी नैसर्गिक शेती शाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना पिवळे चिकट सापळे, फेरोमोन ट्रॅप, फवारणीचे योग्य नियोजन आणि नैसर्गिक पद्धतीने कीड नियंत्रणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सहायक कृषी अधिकारी गोपाल मानकर यांनी फेरोमोन ट्रॅप व कमीत कमी रासायनिक फवारणी करून उत्पादन घेण्याबाबत मार्गदर्शन केले. सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) संदीप अशोक गवई यांनी पिवळ्या चिकट सापळ्यांच्या वापरातून पांढरी माशी, मावा व तुडतुडे यांचा प्रादुर्भाव कमी करण्याबाबत माहिती दिली. तसेच श्री. सतीश तायडे यांनी कार्बन क्रेडिट विषयावर शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. प्रकल्प संचालक आत्मा यांच्या निर्देशानुसार व तालुका कृषी अधिकारी, मुर्तीजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही शेती शाळा राबविण्यात येत आहे.

# पीआरसी समितीचा अहवाल गोपनीय

## सर्व बाबी विधिमंडळाकडे सादर होणार

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**अकोला :** पंचायत राज समितीच्या अकोला दौऱ्यात जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला. समितीने विविध विभागांच्या ऑडिट अहवालांचे परीक्षण केले असून, त्यातील निरीक्षणे, आक्षेप आणि शिफारशींसह समितीच्या अहवालातील सर्व बाबी गोपनीय ठेवण्यात आल्या आहेत. हा अहवाल विधिमंडळाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती पंचायत राज समितीचे अध्यक्ष आमदार संतोष दानवे यांनी दिली.

पंचायत राज समितीच्या बैठकीत ग्रामीण भागातील



## पाणीपुरवठा, जिल्हा परिषद शिक्षक बदलीसह विविध मुद्द्यांवर समितीसमोर चर्चा

पाणीपुरवठा, जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या, विकासकामे, निधीचा वापर आणि प्रशासकीय कामकाजाशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. संबंधित विभागांकडून कागदपत्रे आणि आवश्यक माहिती घेऊन समितीने या बाबींची छाननी केली. ऑडिट अहवालांमध्ये नोंदविण्यात आलेल्या निरीक्षणांवरही समितीने चर्चा केली. मात्र, समितीने केलेले परीक्षण, त्यातील आक्षेप आणि शिफारशी याबाबतची माहिती सध्या सार्वजनिक करता येणार नसून सर्व बाबी गोपनीय असल्याचे अध्यक्ष दानवे यांनी स्पष्ट केले.

# स्वामी विवेकानंद विद्यालयात गोपाळकाला व शिक्षक दिन उत्साहात

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**अकोला :** तुकाराम चौकातील स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात गोपाळकाला व शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करून शिक्षक दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या हस्ते शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त व मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. गोपाळकालानिमित्त विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या बाललीला, दहीहंडी तसेच विविध सांस्कृतिक व पारंपरिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सुंदर प्रदर्शन केले. दहीहंडीच्या कार्यक्रमाने विशेष रंगत आणली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. कार्यक्रमास मुख्याध्यापिका मनीषा उंबरकर, मुख्याध्यापक अविनाश मते, जयेश चोपडे, सोनाली मानकर, आशा डाबेराव, पद्मावती लंगोटे, पौर्णिमा करांडे, हर्षा सोळंके, मनोज बनसोड व मनीष गावंडे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आभार प्रदर्शन करण्यात आले.

# शेतकरी मित्र निवडीसाठी 11 गावांमध्ये महिला आरक्षणाची लॉटरी

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**मुर्तीजापूर :** तालुका कृषी अधिकारी कार्यालयात २ सप्टेंबर रोजी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी 'शेतकरी मित्र' निवडीसंदर्भात सभा आयोजित करण्यात आली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मुर्तीजापूर तालुक्यातील मंजूर कृषी सहायक पदांच्या संख्येनुसार प्रत्येक मंजूर पदासाठी एक शेतकरी मित्र निवडण्यात येणार असून, निवड झालेल्या शेतकरी मित्राचा कार्यकाळ दोन वर्षांचा राहणार आहे.

मुर्तीजापूर तालुक्यात कृषी सहायकांची एकूण ३६ मुख्यालये



असून, त्यापैकी ३० टक्के महिला राखीव शेतकरी मित्रांची निवड करण्याचे नियोजन आहे. यासाठी प्रभारी तालुका कृषी अधिकारी अविनाश लांडे तसेच शेतकरी सल्लागार समितीच्या अध्यक्ष शामल भूषण कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली लॉटरी पद्धतीने महिला शेतकरी मित्रांसाठी गावांची निवड करण्यात आली.

या प्रक्रियेत कुरुम, कवठा सोपीनाथ, राजुरा सरोदे, जामटी खुर्द, ब्रह्मी खुर्द, हिवरा कोरडे, जांभा खुर्द, कानडी, सोनोरी ब पोरी, मंदुरा आणि सालतवाडा या ११ गावांचा महिला शेतकरी मित्रांसाठी समावेश करण्यात आला आहे. उर्वरित मुख्यालये खुल्या प्रवर्गातून शेतकरी मित्र निवडीसाठी नियोजित करण्यात आली आहेत. तालुक्यातील संबंधित ग्रामपंचायती व गावांतील इच्छुक उमेदवारांनी आपल्या ग्रामपंचायतीमधील कृषी विकास समितीकडे अर्ज सादर करावा. समितीमार्फत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व निवडीच्या निकषांनुसार पात्र उमेदवाराची निवड करून प्रस्ताव तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मुर्तीजापूर येथे सादर करण्यात यावा, असे आवाहन शामल कोकाटे यांनी केले आहे.

# शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी साकारल्या शाळेतील प्रशासकीय भूमिका

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**अकोला :** शिक्षक दिनानिमित्त भिकमचंद खंडेलवाल विद्यालयात वर्ग १० वीच्या विद्यार्थ्यांनी अनोख्या उपक्रमातून शाळेतील प्रशासकीय जबाबदाऱ्यांचा अनुभव घेतला. विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या भूमिका उत्स्फूर्तपणे पार पाडत शालेय प्रशासनाची कार्यपद्धती जवळून अनुभवली.

या उपक्रमात आदित्य क्रांती देशमाने याने मुख्याध्यापकाची, राघव कर्णीवाल याने उपमुख्याध्यापकाची, तर आर्यन शाहाकर याने पर्यवेक्षकाची भूमिका निभावली. विद्यार्थ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडत शाळेतील विविध कामकाजाचा अनुभव घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ शिक्षक व प्रशासकीय पदांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव झाली नाही, तर नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, शिस्त आणि जबाबदारीची भावना विकसित होण्यासही मदत झाली. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे शाळेचे मुख्याध्यापक अभय वानखडे यांनी कौतुक केले.

# पणज येथे श्री महालक्ष्मी माता यात्रा महोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**अकोट :** अकोट तालुक्यातील पणज येथील श्री महालक्ष्मी माता मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही १७ ते १९ सप्टेंबर २०२६ दरम्यान श्री महालक्ष्मी माता यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिर समिती व समस्त गावकऱ्यांच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक तयारी करण्यात येत आहे.



१७ सप्टेंबर रोजी गौरी स्थापना, १८ सप्टेंबर रोजी मुख्य यात्रा महोत्सव व महाप्रसादाचे आयोजन, तर १९ सप्टेंबर रोजी गौरी विसर्जनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. यात्रेदरम्यान मंदिर परिसरात पूजन, भजन व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. बोर्डी नदीच्या काठावर वसलेले पणज येथील श्री महालक्ष्मी माता मंदिर हे परिसरातील पुरातन व जागृत देवस्थान म्हणून भाविकांचे श्रद्धास्थान आहे. दरवर्षी यात्रा महोत्सवानिमित्त पणजसह अकोट तालुका व परिसरातील विविध गावांमधून मोठ्या संख्येने भाविक श्री महालक्ष्मी मातेच्या दर्शनासाठी हजेरी लावतात.दरवर्षी वाढणारी

## 17 सप्टेंबरला गौरी स्थापना; 18 रोजी मुख्य यात्रा व महाप्रसाद

भाविकांची संख्या लक्षात घेऊन यंदा दर्शनासाठी सुव्यवस्था, महाप्रसाद, पिण्याचे पाणी, स्वच्छता तसेच भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात येत आहे. यात्रा महोत्सव शांततेत व भक्तिमय वातावरणात पार पडावा यासाठी गावकऱ्यांकडूनही सहकार्य करण्यात येत आहे.या यात्रा महोत्सवात परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्री महालक्ष्मी मातेच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री महालक्ष्मी माता मंदिर समिती व समस्त गावकरी, पणज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पातुरात साकारणार एक हजार पर्यावरणपूरक गणेशमूर्ती!

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**पातूर :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पातूर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी एक हजार पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारण्याचा संकल्प केला आहे. शाळेत नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी हा संकल्प केला.

या कार्यशाळेत पर्यावरणप्रेमी शरद कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलन समितीचे अध्यक्ष डॉ. रामेश्वर

## किड्स पॅराडाईजच्या विद्यार्थ्यांचा संकल्प



बरगट होते. वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष डांगे, झी 24 तासचे जिल्हा प्रतिनिधी जयेश जगड, किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे, कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे, गुल्हाने आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक गोपाल गाडगे यांनी केले. संतोष डांगे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले.

शरद कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, नीतू ढोणे, नरेंद्र बोरकर, प्रियंका चव्हाण, बजरंग भुजबळराव, स्वप्निल पाटील, अविनाश पाटील, यश गवई, शुभांगी बोरकर, स्मितल उगले, वैशाली इंगळे, अक्षय तायडे, सदानंद कातखेडे, हरिष सौंदळे, तेजस्विनी गवई, समीक्षा डोंगे, मानसी दाते, धनश्री बोचरे, मरियम फातेमा, कल्पना वानेरे, केशनी नकाशे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# टपऱ्यांवर कारवाईचा हातोडा; पक्क्या अतिक्रमणांना अभय का ?

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

संदीप रत्नपारखी

**‘फक्त टपऱ्या हटवून शहर अतिक्रमणमुक्त होणार नाही’**

■ अतिक्रमण हटाव मोहिमेला नागरिकांचा विरोध नसून कारवाईत समानता असावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. छोट्या व्यावसायिकांवर तातडीने हातोडा चालविला जात असेल, तर सार्वजनिक रस्ते आणि जागा व्यापणाऱ्या मोठ्या पक्क्या बांधकामांवरही त्याच निकषाने कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी होत आहे.

**दिग्रस** : शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी दिग्रस नगरपरिषदेने सुरू केलेल्या मोहिमेने वेग घेतला असला, तरी या कारवाईच्या स्वरूपावरून आता प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. रस्त्यालगतच्या छोट्या टपऱ्या, हातगाड्या आणि लहान व्यावसायिकांच्या अतिक्रमणांवर कारवाई होत असताना, वर्षानुवर्षे उभ्या असलेल्या पक्क्या सिमेंट-काँक्रीटच्या बांधकामांचे काय, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

लाठीवाला पेट्रोल पंप ते वाल्मीकनगरपर्यंत अतिक्रमणांचा विळखा आहे.

लाठीवाला पेट्रोल पंपापासून वाल्मीकनगरपर्यंतच्या मार्गावर रस्त्यालगत झालेल्या पक्क्या बांधकामांमुळे वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी झाली आहे. परिणामी या मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या भागात वाहतूक नियमनासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने समस्या अधिक गंभीर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**अतिक्रमण हटणारच !**

दरम्यान, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी केदारे यांनी अतिक्रमणधारकांना कारवाईबाबत स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. ‘अतिक्रमण हटणार म्हणजे हटणारच,’ अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. नगरपालिका कर्मचारी कारवाई करून निघून गेल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा अतिक्रमण करता येईल, या भ्रमात राहू नये, असेही त्यांनी बजावले.

टॅक्सची पावती नावावर असणे म्हणजे संबंधित जागेची मालकी सिद्ध होत नाही, असेही मुख्याधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

> ■ आता प्रशासनाच्या भूमिकेची खरी परीक्षा पक्क्या अतिक्रमणांवरील कारवाईत होणार आहे. लाठीवाला पेट्रोल पंप ते वाल्मीकनगर या मार्गावरील अतिक्रमणे हटवून वाहतुकीचा मार्ग मोकळा करण्यासाठी प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे दिग्रसकरांचे लक्ष लागले आहे.

## महिलांनी कौशल्याच्या जोरावर स्वावलंबी व्हावे : शबाना सोलंकी



प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**आर्णी** : महिलांनी कोणावरही अवलंबून न राहता आपल्या कष्ट आणि कौशल्याच्या जोरावर स्वतःच्या पायावर उभे राहावे. कौशल्याचा विकास करून आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने महिलांनी वाटचाल करावी, असे आवाहन शबाना सोलंकी यांनी केले.

आर्णी येथे ३ सप्टेंबर रोजी शबाना सोलंकी यांच्या विशेष सहकार्य व मार्गदर्शनाखाली ‘पिगमेंटेशन-मुक्त’ सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सेमिनारचे आयोजन प्रियंका मादेशवार यांनी केले. त्यांच्या सहकारी स्वाती जुनघरे यांनी कार्यक्रमाच्या नियोजनात सहकार्य केले. सेमिनारमध्ये ट्रेनर सोनाली देशमुख व रूपाली पाटील यांनी उपस्थितांना पिगमेंटेशन तसेच त्वचेची निगा आणि सौंदर्यविषयक विविध बाबींवर मार्गदर्शन केले. महिलांनी या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाला पत्रकार बाबिता शिवणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाजिया मॅकओव्हर, शहिनाज मॅकओव्हर, निलो मॅकओव्हर, माहेक खान यांच्यासह शहरातील अनेक ब्युटीशियन आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# राहुल गांधींवरील एफआयआर विरोधात काँग्रेसचा निषेध मोर्चा




प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**यवतमाळ** : काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या एस आय आर च्या निषेधार्थ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवारी यवतमाळात जिल्हास्तरीय निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच संविधानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

राहुल गांधी यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली FIR ही राजकीय द्वेषातून करण्यात आलेली कारवाई असल्याचा आरोप यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला. विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी शासकीय यंत्रणांचा गैरवापर केला जात असल्याचा आरोपही करण्यात आला. लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी काँग्रेसचा संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. मोर्चादरम्यान सहभागी कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ तसेच लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी जोरदार घोषणाबाजी केली.

राहुल गांधी यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली FIR तातडीने मागे घ्यावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. राजकीय विरोधकांवर सूडबुद्धीने कारवाई करण्याऐवजी लोकशाही मूल्यांचा सन्मान करावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

मोर्चात जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अ‍ॅड. नाईकजी नाईक, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी आमदार वामनराव कासावर, आमदार बाळासाहेब मांगुळकर, कोषाध्यक्ष राजीव निलावार, उपाध्यक्ष जितेंद्र मोघे, अरविंद वाढोणकर, संतोष बोरले, सरचिटणीस अनिल गायकवाड, सुरेश नरवाडे, सचिव शशांक केंढे, शहराध्यक्ष प्रा. अनिल देशमुख, तालुकाध्यक्ष रमेश भिसनकर यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले होते.

याशिवाय वैशाली सवई, स्वाती येंडे, सीमाताई तेलंगे, बाजार समिती सभापती रवी ढोक, जाफर खान, विशाल पावडे, प्रमोद बगाडे, सविताताई चव्हाण, साधनाताई शंभरकर यांच्यासह युवक काँग्रेसचे आकाश धांदे, सोहेल अहेमद, निलेश राऊत, अनिस सय्यद तसेच जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अधिवक्ता शेख सलीम सौदागर जिल्हाध्यक्षपदी

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**उमरखेड** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) अल्पसंख्याक विभागाच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी अधिवक्ता शेख सलीम अब्दुल मजीद सौदागर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अल्पसंख्याक विभागाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अफजल फारूक यांनी २ सप्टेंबर रोजी नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या विचारांनुसार अल्पसंख्याक समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी नवनियुक्त जिल्हाध्यक्षांवर सोपविण्यात आली आहे. तसेच यवतमाळ जिल्ह्यात पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याचे आवाहन नियुक्तीपत्रातून करण्यात आले आहे.

प्रदेशाध्यक्ष अफजल फारूक यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र देण्यात आले. दरम्यान, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अधिवक्ता शेख सलीम अब्दुल मजीद सौदागर यांचे इनायत उल्ला खान, राजू भैय्या जयस्वाल, प्रदीप पाटील देवसरकर, मुक्तार भाई, युसुफ सौदागर, जुबेर खान यांच्यासह पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कौतुक केले.

# दुचाकीसह आरोपी जेरबंद; पाच मोटारसायकल जप्त

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**यवतमाळ** : यवतमाळ शहरासह परिसरात मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करीत एका आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीच्या पाच दुचाकी, अंदाजे अडीच लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

इमरान ऊर्फ इमली खां इस्माईल खां (३६, रा. कुऱ्हा, ता. तिवसा, जि. अमरावती) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

यवतमाळ उपविभागात चोरी, घरफोडी व मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला आरोपीबाबत गोपनीय माहिती मिळाली. इमरान हा बाभुळगाव मार्गे जाणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी धामणगाव रोडवरील करळगाव घाट परिसरात सापळा रचला.

यावेळी निळ्या रंगाची फॅशन प्रो मोटारसायकल घेऊन जाणाऱ्या इमरानला पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत त्याने सदर दुचाकी २४ ऑगस्ट रोजी यवतमाळ बसस्थानकातून चोरी केल्याची कबुली दिली. अधिक चौकशी केली असता त्याने यवतमाळ शहरासह इतर ठिकाणांहून आणखी चार दुचाकी चोरी केल्याचे सांगितले.

पोलिसांनी चोरीच्या दुचाकींची माहिती तपासली असता त्यापैकी काही वाहनांबाबत अवधूतवाडी, कोतवाली अहिल्यानगर आणि पुलगाव पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपीकडून एकूण पाच दुचाकी जप्त करून सुमारे २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी अवधूतवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष गावंडे, गजानन राजमल्लु, पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# संदीप ठाकरे यांची शिवसेना उपजिल्हाप्रमुखपदी निवड

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**उमरखेड** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या यवतमाळ जिल्ह्यातील संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून, उपजिल्हाप्रमुखपदी युवा नेतृत्व संदीप ठाकरे यांची निवड करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली.

संदीप ठाकरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून पक्षात विविध जबाबदाऱ्या सांभाळत तळागाळातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी काम केले आहे. संघटनात्मक बांधणीसह सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर उपजिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी सोपविल्याचे सांगण्यात आले.

**पक्ष संघटना बळकट करण्यावर भर** : नियुक्तीनंतर संदीप ठाकरे म्हणाले, “पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आगामी काळात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तळागाळातील कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध राहू.” आपल्या निवडीचे श्रेय त्यांनी पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे, जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड आणि जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे यांना दिले.

# ईश्वर चिठ्ठीतून ४० आदिवासी लाभार्थी निवडले

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**पुसद** : शासकीय अनुदानावरील पाच शेळ्या आणि एक बोकड योजनेअंतर्गत आदिवासी लाभार्थ्यांची निवड बुधवारी पुसद येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात ईश्वर चिठ्ठीद्वारे करण्यात आली. पात्र लाभार्थ्यांच्या समक्ष पार पडलेल्या या प्रक्रियेत तालुकानिहाय निर्धारित उद्दिष्टानुसार ४० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली.

या योजनेसाठी पुसद प्रकल्प कार्यालयाकडे एकूण १ हजार २७९ पात्र अर्ज प्राप्त झाले होते. उपलब्ध उद्दिष्टाच्या तुलनेत अर्जांची संख्या अधिक असल्याने लाभार्थी निवडीसाठी ईश्वर चिठ्ठीचा आधार घेण्यात आला. त्यामुळे निवड प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याचा प्रयत्न करण्यात आला.

योजनेअंतर्गत पुरुष लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदान, तर महिला लाभार्थ्यांना शंभर टक्के अनुदान देण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग, विधवा आणि परित्यक्ता महिलांना लाभार्थी निवडीत प्राधान्य देण्यात आले. प्रकल्प अधिकारी अमोल मेतकर यांनी लाभार्थ्यांना कोणत्याही मध्यस्थाच्या आमिषाला बळी न पडण्याचे आवाहन केले. योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणताही एजंट किंवा अधिकारी पैशांची मागणी करीत असल्यास त्याला पैसे देऊ नयेत. अशा प्रकारची मागणी झाल्यास तातडीने प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

निवड प्रक्रियेदरम्यान सहाय्यक प्रकल्प अधिकारी उमाकांत कोटूरवार, कार्यालय अधीक्षक संदीप राऊत, आदिवासी विकास निरीक्षक शिरीष मेतकर यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

विदर्भ आदिवासी विकास परिषदेचे पुसद तालुकाध्यक्ष सुरेशभाऊ सिडाम, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मेटकर, दिलीप वावधने, स्वप्नील इंगळे, सुभाष बुरकुले, तुषार व्यवहारे यांच्यासह विविध तालुक्यांतील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवड प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पडल्याबद्दल सहाय्यक प्रकल्प अधिकारी कोटूरवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# हर हर महादेवच्या जयघोषात रंगणार कावड यात्रा

## ७ सप्टेंबरला जलाभिषेकासाठी कावड प्रस्थान; सायंकाळी सिद्धेश्वर मंदिरात अभिषेक

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

> ■ ७ सप्टेंबरला सकाळी श्रीक्षेत्र हिवरा संगम येथे विधिवत पूजन केल्यानंतर जलाभिषेकासाठी कावडीचे प्रस्थान होणार आहे. दुपारी एक वाजता कावड यात्रा आर्णी शहरात दाखल होईल. त्यानंतर शहरातील भाविक कावडीत सहभागी होत श्री सिद्धेश्वर महादेव मंदिराकडे मार्गस्थ होतील.

**आर्णी** : श्रीक्षेत्र हिवरा संगम ते आर्णी अशी भव्य कावड यात्रा येत्या ७ सप्टेंबरला काढण्यात येणार आहे. श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर कावड यात्रा समिती, विश्व हिंदू परिषद व बजरंग दल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या यात्रेचे हे पाचवे वर्ष आहे. ‘हर हर महादेव’च्या जयघोषात निघणाऱ्या या यात्रेत शिवभक्तांसह रामभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

यात्रेच्या पूर्वतयारीसाठी ६ सप्टेंबर रोजी रात्री नऊ वाजता श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात बैठक आयोजित करण्यात आली आहे. यात सर्व शिवभक्त व रामभक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कावड यात्रा जुनी वस्ती, सराफा लाईन, मेन लाईन, रामराज्य चौक, पाण्याची टाकी व संभाजीनगर मार्गे श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात पोहोचेल. सायंकाळी साडेसात वाजता मंदिरात कावडीतील पवित्र जलाने भगवान सिद्धेश्वर महादेवाचा जलाभिषेक करण्यात येणार आहे. जलाभिषेकानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्यात शहर व परिसरातील शिवभक्त, रामभक्त, नागरिक तसेच भाविकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन कावड यात्रा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर कावड यात्रा समिती, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# सेवा समाप्तीनंतरचा सत्कार म्हणजे कार्याची पावती

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**शेंबाळपिंपरी** : “सेवा समाप्तीनंतर होणारा नागरी सत्कार म्हणजे केलेल्या प्रामाणिक कार्याची नागरिकांकडून मिळालेली पावती आहे,” असे प्रतिपादन पुसदचे उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल यांनी केले.

शेंबाळपिंपरी येथील राधाकृष्ण मंगल कार्यालयात सेवापूर्ती नागरी सत्कार समितीच्या वतीने पोलिस चौकीचे पोलिस उपनिरीक्षक शिवाजीराव देशमुख यांच्या सेवा समाप्तीनिमित्त निरोप व नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी देशमुख यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, भेटवस्तू आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

प्रमुख अतिथी म्हणून बोलताना बिजवल यांनी देशमुख यांच्या कार्याचे कौतुक करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

“आजच्या काळात प्रामाणिकपणे आणि चांगले काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याची नागरिकांकडून दखल घेतली जात नाही, ही खंत आहे. मात्र, शेंबाळपिंपरीतील नागरिकांनी देशमुख यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा केलेला सन्मान कौतुकास्पद आहे,” असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेंबाळपिंपरी ग्रामपंचायतीचे सरपंच तथा प्रशासक रविंद्र महल्ले होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी सभापती तथा वसंत सहकारी साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तातूभाऊ देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सदबाराव मोहटे, खंडाळा पोलिस ठाण्याचे ठाणेदार विनीत घागे, माजी प्राचार्य विजयकुमार वाकडे आणि पोलिस पाटील प्रतिभा कांबळे उपस्थित होते.

स्वागताध्यक्ष जैनुलभाई सिद्दीकी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, शिवाजीराव देशमुख यांनी २७ वर्षांच्या पोलिस सेवेत शेंबाळपिंपरी येथे तब्बल आठ वर्षे निःस्वार्थी व प्रामाणिकपणे सेवा बजावली. गावातील विविध समाजघटकांमध्ये शांतता व सलोखा राखण्यासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास सरपंच, पोलिस पाटील, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, नागरिक, नातेवाईक आणि पत्रकार उपस्थित होते. सूत्रसंचालन बापुराव कांबळे यांनी केले. आभार राजेश वाहूळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अमीन सिद्दीकी, देवानंद वाहूळे, विजय कांबळे यांच्यासह तरुणांनी परिश्रम घेतले.

# मॅकलवार स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी



प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**झरी-जामणी** : मॅकलवार इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा तसेच विविध पौराणिक व्यक्तिरेखांच्या वेशभूषा परिधान करून सहभाग घेतला. गीत, नृत्य, अभिनय तसेच श्रीकृष्णाच्या बाललीलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. बालकृष्णाच्या वेशातील चिमुकल्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रेम, मैत्री, धैर्य, कर्तव्य आणि सत्य या मूल्यांची माहिती देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहासोबतच भारतीय संस्कृतीविषयी अभिमानाची भावना निर्माण झाली.

संस्थेचे अध्यक्ष प्रकाश मॅकलवार व सचिव किरण मॅकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक साईकिरण दोनतुलवार, महेश गेडाम तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे जन्माष्टमी उत्सव आनंदात पार पडला.

# रस्ते, घरकुल, आरोग्य, पाणी पुरवठ्याच्या समस्या सोडवा, खासदार बळवंत वानखडे यांचे निर्देश!

## पालकमंत्र्यांचे निर्देश; खा. डॉ. अनिल बोंडे, आ. प्रविण पोटे यांनी केले कुटूंबियांचे सांत्वन

प्रतिनिधी ५ सप्टेंबर




**अमरावती :** केंद्र शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून निधी देण्यात येतो. या निधीचा योग्य विनियोग करून ग्रामीण जनतेचे जीवन सुकर करावे. यात प्रामुख्याने पांदण रस्ते, घरकुल, आरोग्य यासोबतच पाणी पुरवठ्याच्या समस्या सोडविण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवनात श्री. वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा पार पडली. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे, गजानन लवटे, प्रविण तायडे, अशासकीय सदस्य मोरेश्वर वानखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदवले, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख आदी उपस्थित होते. खासदार श्री. वानखडे यांनी, जिल्ह्यात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने रस्त्यांचा विकास होणे आवश्यक आहे. चांगल्या रस्त्यांमुळे जिल्ह्यात पायाभूत सुविधा निर्माण होण्यास मदत मिळणार आहे. जिल्ह्यातील काही मार्गाची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने या कामांना गती देण्यात यावी. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्याला प्राधान्य देण्यात यावे. त्यासोबतच शेतकऱ्यांसाठी पांदण रस्ते महत्वाचे आहेत. यासाठी पांदण रस्त्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात यावे. यातील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा. गरजूंना आर्थिक सहाय्याच्या योजना महत्वाच्या आहेत. प्रामुख्याने दिव्यांगांना देण्यात येणारी मदत थांबविण्यात येऊ नये. आवश्यकता भासल्यास तालुकास्तरावर शिबीरे घेऊन यूडीआयडी प्रमाणपत्र वाटप करण्यात यावे. यासाठी आवश्यक त्या सुविधा उभारण्यात याव्यात. ग्रामीण भागातील घरकुलांचा प्रश्न महत्वाचा आहे. घरकुल मंजूर झाल्यानंतर संबंधितास पाच ब्रास रेतीचे वाटप करण्यासाठी पास देण्यात यावा. तसेच जवळपास असलेल्या रेतीच्या उपलब्धतेबाबत माहिती देण्यात यावी. तसेच टप्पेनिहाय अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न करावेत.आरोग्य ही महत्वाची बाब असून यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. रूग्णवाहिकांना इंधनाचा नियमित पुरवठा होईल, याची दक्षता घेण्यात यावी. मेळघाटात आरोग्याचे प्रश्न असल्याने याठिकाणी रूग्णवाहिका उपलब्ध राहिल, याची दक्षता घेण्यात यावी. आरोग्यासोबतच पाणी पुरवठा महत्वाचे आहे. जलजीवन मिशनमधून पूर्ण करण्यात येणारी कामे तातडीने पूर्ण करावीत. गावात प्रत्यक्ष पाणी पुरवठा सुरू होईल, यासाठी कामे तातडीने पूर्ण करावीत. यामुळे साथीच्या आजारावर नियंत्रण मिळविणे शक्य होईल. युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित करण्यात यावे. येत्या 29 सप्टेंबर रोजी तालुकास्तरावर रोजगार मेळावे आयोजित करण्यात येत आहे. यासाठी नियोजन करण्यात यावे. तसेच प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. त्यांना प्रशिक्षण आणि बँकांकडून कर्ज मंजूर होण्यासाठी प्रयत्न करावेत. हे उद्योग कायमस्वरूपी सुरू राहावेत, यासाठी प्रयत्न करावेत. कंत्राटी तत्वावर कार्यरत कामगारांना पूर्ण वेतन मिळावे, यासाठी कामगार विभागाने जागृती करावी. क्रिडा क्षेत्रात उत्कृष्ट खेळाडू घडावेत, यासाठी विद्यापीठाचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना खासदार श्री. वानखडे यांनी केल्या.

# विद्यापीठात 'इंडियन स्ट्रॅटिग्राफी सिम्प्लीफाईड' पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन



प्रतिनिधी ५ सप्टेंबर

अमरावती: संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र पदव्युत्तर विभागात बी.एस्सी. भूगर्भशास्त्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाया 'इंडियन स्ट्रॅटिग्राफी सिम्प्लीफाईड : अ ग्रॅज्युएट लेव्हल अप्रोच' या नवीन पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला. 'ज्ञानपथ' प्रकाशनाद्वारे हे पुस्तक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सिपना कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराचे प्राचार्य तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, प्रमुख अतिथी म्हणून भारतीय महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक व विभागप्रमुख तथा भारतीय विद्या मंदिर, अमरावतीचे उपाध्यक्ष डॉ. सतीश कुलकर्णी, विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. यादवकुमार मावळे व्यासपीठावर उपस्थित होते भारतीय स्तरविज्ञानाचा अभ्यास करणाया विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक सोप्या, सुसंगत आणि पदवी स्तराला अनुरूप स्वरूपात तयार करण्यात आले आहे. भारतीय उपखंडातील विविध भूवैज्ञानिक स्तररचना, त्यांचा कालानुक्रमिक विकास आणि संबंधित भूवैज्ञानिक संकल्पना समजून घेण्यासाठी हा ग्रंथ विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार आहे. बी.एस्सी. जिऑलॉजीच्या विद्यार्थ्यांसोबतच भूगर्भशास्त्राच्या उच्च शिक्षणासाठी आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठीही हे पुस्तक महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे संपादन डॉ. सतीश कुलकर्णी आणि डॉ. यादवकुमार मावळे यांनी केले आहे. पुस्तकाच्या लेखनात प्रादेशिक स्तरावरील अनुभवी व नामवंत भूगर्भशास्त्र प्राध्यापकांचा सहभाग असून त्यामध्ये डॉ.एस.के. पौनिकर (सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र व जिओइन्फॉरमॅटिक्स विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती), डॉ.एस.एस. देशमुख (विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र विभाग, गुलाम नबी आझाद कॉलेज, बार्शीटाकळी), प्रा.पी.एम. गिरी (सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र व जिओइन्फॉरमॅटिक्स विभाग, श्री शिवाजी कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड सायन्स, अकोला), डॉ.पी.एस. परिमल (सहयोगी प्राध्यापक, भूगर्भशास्त्र विभाग, जी.एस. टोम्पे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार), डॉ.एम.एम. देशमुख (विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र व जिओइन्फॉरमॅटिक्स विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती) आणि डॉ.एस.आर. वरघट (विभागप्रमुख व सहाय्यक प्राध्यापक, भूगर्भशास्त्र विभाग, भारतीय महाविद्यालय, अमरावती) यांचा समावेश आहे. विद्यापीठ तसेच परिसरातील संलग्नित महाविद्यालयांच्या भूगर्भशास्त्र विभागातील प्राध्यापकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या प्रकाशन सोहळ्यामुळे अमरावतीच्या शैक्षणिक वर्तुळात या ग्रंथाचे विशेष स्वागत करण्यात आले. यावेळी डॉ. प्रेमानंद तिडके, डॉ. मयुरा देशमुख, डॉ. सुमेध वरघट, डॉ. सौरभ पौनिकर, डॉ. प्रीतम पाल आणि श्री अभिषेक कडू यांच्यासह विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील प्राध्यापकांची प्रमुख उपस्थिती होती.

# इंडिया स्किल्स'स्पर्धेसाठी उमेदवारांना 15 सप्टेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

अमरावती : 'इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७'साठी ऑनलाईन नोंदणी सुरु असून जिल्ह्यातील तंत्रकुशल व व्यावसायिक कौशल्यधारक उमेदवारांना १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात आले आहे. इंडिया स्किल्स स्पर्धेच्या माध्यमातून २३ वर्षांखालील उमेदवारांना जिल्हा , राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या स्पर्धेद्वारे विविध तांत्रिक,व्यावसायिक,डिजिटल आणि मेकॅट्रॉनिक्स कौशल्यांमध्ये सहभाग घेता येणार आहे. राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करणाऱ्या उमेदवारांस आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत देशाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळणार आहे. तसेच आकर्षक पारितोषिके, प्रमाणपत्रे आणि मार्गदर्शनही मिळणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष ठेवण्यात आला आहे. वैयक्तीक सहभागासाठी ५६ क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतर झालेला असावा. तसेच ऑटोनॉमस मोबाईल रोबोटिक्स,कॉंक्रिट कन्स्ट्रक्शन वर्क, लॅंडस्केप गार्डनिंग या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००६ किंवा त्यानंतर झालेला असावा. सायबर सिक्युरिटी,इंडस्ट्री ४.०,मॅकॅट्रोनिक्स,रोबोट सिस्टिम इंटीग्रेशन या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतर झालेला असावा. शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय),पॉलेटेक्निक,इंजिनियरींग कॉलेज,खाजगी शाळा,विद्यापीठ,प्रशिक्षण संस्था तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या अधिनस्त सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्थांना या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागासाठी इच्छुक उमेदवारांना skillindiadigital.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार च उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

# सेमाडोह येथे 13 नालसा योजनांची प्रभावी अंमलबजावणी

प्रतिनिधी ५ सप्टेंबर




**अमरावती:** जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या (नालसा) मेगा ड्राईव्ह अंतर्गत चिखलदरा तालुक्याच्या सेमाडोह गावातील नागरिकांच्या दारापर्यंत विधी सेवा, कायदेविषयक मार्गदर्शन व विविध शासकीय योजना अशा एकूण १३ नालसा योजनांचा लाभ पोहचविण्यात येत आहे. ग्रामस्थांमध्ये या उपक्रमाबाबत उत्साह असून, त्यांच्या दारापर्यंत विधी सेवा आणि शासनाच्या योजनांची माहिती व लाभ पोहोचत असल्याने ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत. नालसाच्या निर्देशानुसार देशभरातील नागरिकांना त्यांच्या दारापर्यंत विधी सेवा, कायदेविषयक मार्गदर्शन तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रासह १८ राज्यांमध्ये नालसा मेगा ड्राईव्ह-१ हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. राज्यातील निवडक जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाद्वारे या उपक्रमासाठी अमरावती जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील दुर्गम व सामाजिक-आर्थिकदृष्ट्या गरजू भागाचा विचार करून चिखलदरा तालुक्यातील सेमाडोह गावाची निवड करण्यात आली आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष उज्वला नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांच्या समन्वयातून २५ ऑगस्ट २०२६ पासून मेगा ड्राईव्हची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. हा मेगा ड्राईव्ह २३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत चालणार आहे. सेमाडोह येथे नालसा मेगा ड्राईव्ह टप्पा १ अंतर्गत १३ नालसा योजनांची तळागाळात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीचे सचिव, कार्यालयीन कर्मचारी तसेच पॅरा-लीगल स्वयंसेवक सेमाडोह गावास वारंवार भेटी देऊन नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत आहेत. घरभेटी, सर्वेक्षण, कायदेविषयक जनजागृती, पात्र लाभार्थ्यांची ओळख वप्रकरणांची नोंद तसेच आवश्यकतेनुसार संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधण्याचे काम सुरू आहे. गावातील नागरिकांची माहिती संकलित करून पात्र लाभार्थ्यांची ओळख करण्यात येत आहे. नागरिकांना त्यांच्या हक्कांची, विधी सेवांची तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांची माहिती देऊन आवश्यकतेनुसार विधी सहाय्य व संबंधित विभागांशी समन्वय साधून योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या विशेष उपक्रमास ग्रामस्थ, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य आणि चिखलदरा तालुका प्रशासनाचे सहकार्य प्राप्त होत आहे.

# वैष्णवी इंगळे यांना आचार्य पदवी

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने वैष्णवी अनिलराव इंगळे यांना आचार्य पदवी बहाल करण्यात आली आहे. त्यांनी 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील प्रबळ अॅलर्जीनजन्य बुरशीजन्य वायुकणांमधील ऋतुनुसार होणारे बदल' या विषयावर सखोल संशोधन करून आपला शोधप्रबंध विद्यापीठास सादर केला. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील संशोधक विद्यार्थिनी असलेल्या वैष्णवी इंगळे यांनी आपल्या संशोधनामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती परिसरातील वातावरणात आढळणाऱ्या विविध प्रकारच्या अॅलर्जीनजन्य बुरशीजन्य वायुकणांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला.



आपला प्रबंध संशोधक पर्यवेक्षक प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडे सादर केला होता. त्यांनी आपल्या संशोधनाचे श्रेय संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख यांच्यासह समस्त कार्यकारिणीसह प्राध्यापक वर्ग, मित्र परिवाराला दिले.

# गोरक्षण संस्थेस कडबा कटर मशीन देऊन गोसेवा बोके यांचे हस्ते पूजन

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



दर्यापूर: दर्यापूर परीसरातील माहुली ( धांडे) शेत शिवारात कार्यरत गाडगेबाबा गोरक्षण संस्थेस एका आधुनिक कडबा कापणी यंत्राची भेट मिळाली आहे . दर्यापूर येथील सुप्रसिद्ध दुर्गा वेल्डिंग वर्कस् यांनी दान देऊन ही गो सेवा साधली आहे . या प्रतिष्ठानचे संचालक सूरज राजपूत हे नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती जीवनासाठी सुविधा असणाऱ्या विविध यंत्राची निर्मिती करीत असतात . त्यांचे द्वारे गोरक्षण संस्थेस अत्यंत गरजेचे असणारे कडबा कटर यंत्र दान स्वरूपात उपलब्ध झाल्याने संस्थेच्या विश्वस्त मंडळाने सूरज राजपूत यांचे मनस्वी अभिनंदन केले आहे . या यंत्राचे विधिवत पूजन संस्थेस सदिच्छा भेट देणारे पुणे जिल्ह्य मावळ तालुक्यातील गायत्री गोशाळा संस्थेचे संचालक तथा सेवा निवृत्त आय पी एस अधिकारी विक्रम बोके यांचे शुभहस्ते संपन्न झाले . याप्रसंगी प्रगतीशील शेतकरी जयसिंगदादा देशमुख तथा तळवेल येथील संभाजी देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती होती . लवकरच गोरक्षण संस्था व दुर्गा वेल्डिंग वर्कस् यांच्यात शेती विषयक कार्यासाठी विविध संशोधीत उत्पादने व यंत्र निर्मिती यासाठी सामंजस्य करार होत आहे हे या प्रसंगा निमित्याने अधोरेखांकित ठरणारे आहे .

# नागरिकांच्या समस्या निवारणासाठी दररोज वेळ राखीव

## अभ्यागतांसाठी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत भेटी अनिवार्य

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**अमरावती :** जिल्ह्यातील सर्व शासकीय व महसूल विभागाच्या कार्यालय प्रमुखांनी नागरिकांच्या अडचणी व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत अभ्यागतांना भेटणे अनिवार्य करण्यात आले आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या निर्देशांनुसार निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी परिपत्रक जारी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुद्रांक जिल्हाधिकारी तसेच भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी दररोज दुपारी ३ ते ५ ही वेळ नागरिकांच्या भेटीसाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. राखीव वेळेत विभाग प्रमुखांनी शक्यतो स्वतः उपस्थित राहून नागरिकांची निवेदने, तक्रारी ऐकून त्यावर नियमानुसार योग्य ती कारवाई करावी लागणार आहे. ज्या प्रकरणांचे तात्काळ निवारण शक्य नाही, त्यांची नोंद घेऊन विहित कालमर्यादेत कार्यवाही करणे बंधनकारक राहील. अत्यावश्यक शासकीय बैठका किंवा अपरिहार्य प्रशासकीय कारणांमुळे विभाग प्रमुख उपस्थित राहू शकत नसल्यास, त्यांच्या जागी सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करावे. नागरिकांना विनाकारण ताटकळत राहावे लागू नये आणि कार्यालयीन कामकाज अधिक सुरळीत व परिणामकारक व्हावे, यासाठी या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

# पालकत्व मिळाल्याने पालकांच्या जीवनात आनंदाची पहाट!

## दत्तक विधानात जिल्ह्याची ऐतिहासिक कामगिरी; एकाच दिवसात ९ बालकांना मिळाला हक्काचा निवारा

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

अमरावती : प्रत्येक बालकाला प्रेम, माया, सुरक्षितता आणि कुटुंबाचा आधार मिळावा, या उदात्त उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या दत्तक विधान प्रक्रियेत जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी एकाच दिवशी तब्बल ९ दत्तक प्रकरणांमध्ये आदेश पारित करून या बालकांच्या आयुष्यात नवीन आशा आणि आनंदाचा अध्याय प्रारंभ केला आहे. तसेच पालकत्व मिळाल्याने पालकांच्या जीवनात आनंदाची पहाट उगविली आहे.

प्रत्येक बालकाला सुरक्षित, प्रेमळ आणि कायमस्वरूपी कुटुंबामध्ये वाढण्याचा अधिकार आहे. दत्तक विधान प्रक्रिया ही केवळ एका कायदेशीर आदेशापुरती मर्यादित नसून ती एका बालकाच्या संपूर्ण आयुष्याला नवी दिशा देणारी प्रक्रिया आहे. बालकांच्या सर्वोत्तम हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन पात्र दत्तक प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. एकाच दिवशी ९ दत्तक आदेश पारित होणे ही निश्चितच समाधानाची बाब असून,यामुळे या बालकांना नवीन कुटुंब,नवीन नाती आणि उज्ज्वल भविष्याची संधी प्राप्त झाल्याचे जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले.



बालकांचे हित, संभाव्य दत्तक पालकांची पात्रता, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, तसेच कायदेशीर प्रक्रियेची पडताळणी व सर्व बाबींचा सखोल विचार करून जिल्हाधिकारी येरेकर यांनी ९ प्रकरणांमध्ये दत्तक आदेश पारित केले. पालकांच्या संगोपनापासून वंचित राहिलेल्या बालकांना कायमस्वरूपी प्रेमळ कुटुंब मिळवून देण्याच्या दिशेने उचललेले हे अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या निर्णयामुळे बालकांना सुरक्षित, प्रेमळ आणि स्थिर कौटुंबिक वातावरणात वाढण्याची संधी उपलब्ध झाली आहे. दत्तक विधान प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय डबले, तसेच बाल संरक्षण अधिकारी भूषण कावरे यांच्या समन्वयातून आवश्यक कार्यवाही करण्यात आली.

### बालकाला कुटुंबाचा आधार मिळणे महत्त्वाचे

बालकाला कुटुंबाचा आधार मिळणे ही त्याच्या भावनिक, सामाजिक आणि सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. दत्तक विधान प्रक्रियेमध्ये प्रत्येक प्रकरण अत्यंत संवेदनशीलतेने हाताळले जाते. संबंधित सर्व यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष सातत्याने प्रयत्नशील आहे, असे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय डबले यांनी सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. ५ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
बातमी खास, दखल हमखास, सिटी न्युज सुपरफास्ट...




# शिरपूर झाले होते बिहार, एसपींनी केला सुधार !

## * कोबिंग ऑपरेशन, एकाच वेळी ३ २ ठिकाणी धाडी * देशी पिस्टलसह अवैध घातक शस्त्र साठा जप्त.* अनेक आरोपी अटक , लाखोंचा मुद्देमाल जप्त

● नाजीर शेख @ वाशीम ●

**वाशिमच्या शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोऱ्या आणि इतर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली होती. दरम्यान कमी दरात सोनं विक्रीचे आमिष देऊन एका सोनाराला काही सराईत गुन्हेगारांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दहा लाख लुटल्याची घटना चर्चेत आली होती. या संदर्भात दै. सिटीन्युज सुपरफास्टने 'शिरपूर झाले बिहार ; पोलीसच बनवितात गुन्हेगार' या मथळ्याखाली बातमी प्रसारित केली होते. बातमीमुळे जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात खळबळ उडाली होती. या बातमीची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे यांच्या आदेशाअनव्ये शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काही गावांमध्ये कोंबीग ऑपरेशन राबवून सराईत गुन्हेगारांच्या घराची झडती घेण्यात आली. काही घातक शस्त्र आणि चोरींचा लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून काही अट्टल गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईआधी शिरपूर झाले होते बिहार ,मात्र एनवेळी एसपींनी सुधार केला आहे.**




वाशिमच्या शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पांगरखेडा, वसारी, चांडस, झोडगा आणि बोरगांव येथे वारंवार चोऱ्या आणि इतर गुन्ह्यात वाढ झाली होती .दरम्यान वसारी जवळ एका सोनाराला कमी भावात सोनं विकण्याचे आमिष देवुन १० लाख रुपये लुटल्याची घटना देखील चांगलीच चर्चेत आली होती. या घटना अत्यंत गंभीर असल्याने पोलीस अधीक्षक अँक्शन मोड मध्ये आले आहे. त्यामुळे ३ ते ४ सप्टेंबर रोजी कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. यामध्ये फरार आरोपी, रिकॉर्ड वरील आरोपी, त्यांच्या लपविण्याची ठिकाणे आश्रयस्थाने ,वारंवार चोरीच्या येणाऱ्या तक्रारीची ठिकाणावर लक्ष केंद्रित करून एकाच वेळी ३ २ ठिकाणी छापे मारी करण्यात आली .या पांगरखेडा येथील फरार आरोपी लक्ष्मण चव्हाण याला ताब्यात घेत त्याच्या घराची झडती घेतली असता, १ देशी पिस्टल, ५ जिवंत काडतुसे, २ तलवारी, ६ कुऱ्हाडी, १० लोखंडी सुरे कोयते, केबल, केबल कटर, आणि गावठी शस्त्र असा ४७ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर जुगनू पवार याच्या घरातून तलवार आणि देशी दारू जप्त करण्यात आली. शंकू पवार या पाहीजे आरोपीलाही ताब्यात घेण्यात आले. चंद्रकांत पवार याच्याकडून ३० लिटर हातभट्टी गावठी दारू जप्त करण्यात आली.

वसारी जवळ एक तांदुळ वाहतूक करणाऱ्या ट्रकला ताब्यात घेण्यात आला असून चौकशी केली जात आहे. तसेच चांडस येथून ग्यानु चव्हाण याच्या घरातून कागद नसलेली एक पल्सर दुचाकी जप्त करण्यात आली आहे. झोडगा व बोरगाव येथील अशोक चव्हाण याच्या घरातून लोखंडी तलवार तसेच चांडस येथील दुकान फोडीचा किराणा सामना मिळून आल्याने तो जप्त करत आरोपीला अटक करण्यात आली. या कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये दहशत पसरली असून सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण पवार यांच्या नेतृत्वाखाली पो.नि सुधाकर आडे स्थानिक गुन्हे शाखा ,वाशिम यांच्यासह १ २ पोलीस अधिकारी आणि ८८ पोलीस कर्मचारी कोंबिंग ऑपरेशन मध्ये सहभागी झाले होते.

### पोलीस कर्मचारी बालाजी महल्ले विरुद्ध अनेक तक्रारी; कारवाईची कधी ?

शिरपूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या बालाजी महल्ले नावाच्या पोलीस कर्मचाऱ्या विरुद्ध अनेक तक्रारी असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. कर्तव्यावर असताना मद्यपान करून फिरणे, सर्वसामान्य नागरिकांशी गैरवर्तन करणे, गोरगरीबांना मारहाण करणे अशा विविध स्वरूपाच्या तक्रारी संबंधित कर्मचाऱ्याविरोधात वरिष्ठ स्तरापर्यंत, अगदी मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत पोहोचले आहे. मात्र, या तक्रारींवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. कोंबिग ऑपरेशन राबवून गुन्हेगारांवर कारवाई झाल्याने पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे यांचा कौतुकच केला जात आहे .मात्र पोलीस असून गोर गरिबांना त्रास देणाऱ्या कर्मचारी बालाजी महल्लेवर कधी करावाई होणार असा प्रश्न केला जात आहे.

---

## थोडक्यात

### घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यशाळा



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

घनकचरा व्यवस्थापन ही केवळ स्वच्छतेची बाब नसून सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणाशी निगडित अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. 'घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकांच्या मानसिकतेत बदल घडविणे आवश्यक असून, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

'घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६ : गावस्तरावर अंमलबजावणी- संधी व आव्हाने' या विषयावरील जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश कान्हेकर आणि जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गजानन खुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की, 'घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६च्या अनुषंगाने लोकांच्या मानसिकतेत बदल होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कायदेशीर आयुधे उपलब्ध करून दिली असून, नियमांच्या अंमलबजावणीचे सक्त निर्देश दिले आहेत. त्यामुळे प्रत्येक जिल्हाधिकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.'



---

# नको आकांक्षीत आणि मागासल्याचे कारण, राबवा जलसंधारणाचे धोरण !

## * दुष्काळ मुळे होणार नाही शेतकऱ्याचे मरण * दुष्काळ कायमचा हद्दपार करण्यासाठी जलसंधारण कामांना गती द्या

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्हा आकांशीत आहे मागासलेला आहे याचे कारण देऊ नका, दूष्काळाच्या झळा वारंवार सोसणाऱ्या वाशिम जिल्ह्यात भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी पाझर तलाव, सिंचन तलाव, छोटे-मोठे धरणे, बंधारे, नदी नाल्याचे खोलीकरण करावे , नैसर्गिक जल स्तोत्र आहे त्यांना जिवंत करावे व तातडीने दुरुस्ती करून पाणी साठवण क्षमता वाढवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवडे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले आहे. वाशिम जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाझर तलाव व सिंचन तलावांची स्थिती दुरवस्थेत असून, काही ठिकाणी तलावातील गाळ काढणे, भिंती व बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच नद्या व पाझर तलावांवरील बंधारे मजबूत करून पाणी अडविण्याची क्षमता वाढविण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासनाच्या 'पाणी अडवा, पाणी जिरवा' यासह विविध जलसंधारण योजनांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च होत असला तरी अनेक कामांचे योग्य




**पाझर तलाव, सिंचन तलाव, छोटे-मोठे धरणे व बंधाऱ्यांची दुरुस्ती , नदी -नाले खोलीकरण करून वाढवा पाणी साठवण क्षमता नैसर्गिक जल स्तोत्रांना जिवंत करा सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन**

नियोजन व प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची खंत देवढे यांनी व्यक्त केली आहे.

केवळ निधी खर्च करण्याऐवजी दीर्घकालीन परिणाम साधणाऱ्या कामांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात असेही नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यात काही ठिकाणी पाणी साठवण क्षमतेत वाढ केल्यास मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध होऊ शकते.

पूर्वी काही जलसंधारण कामे झालेल्या ठिकाणी आजही पाणी साठून राहत असल्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे अशा यशस्वी कामांचा अभ्यास करून जिल्ह्यातील इतर ठिकाणीही त्याच धर्तीवर नियोजन करण्याची गरज आहे. दरम्यान, शासनाकडून विविध विकास कामांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जात असताना, ग्रामीण भागातील नागरिक व शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पाणी साठवण आणि जलसंधारणाच्या कामांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

पावसाचे पाणी वाहून जाण्यापासून रोखून ते जमिनीत मुरविण्यासाठी व साठविण्यासाठी व्यापक नियोजन झाल्यास भविष्यातील पाणीटंचाई कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. वाशिम जिल्ह्यात पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठीही अनेकदा टंचाईची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे पाणी उपलब्धतेसाठी दरवर्षी केवळ तात्पुरत्या उपाययोजना करण्याऐवजी कायमस्वरूपी जलसंधारणाची कामे हाती घेण्यात यावीत, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. पाणी साठवणुकीचे प्रभावी नियोजन झाले, तर भविष्यातील पाणीटंचाईवर मोठ्या प्रमाणात मात करता येईल. वाशिम जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती कायमची दूर करण्यासाठी शासनाने जलसंधारणाच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे,' अशी मागणी सुभाष देवडे पाटील यांनी केली आहे.

---

# शिक्षणाची साथ सोडली नाही; मेहनतीने शिक्षकपदाची संधी मिळवली

## १८ वर्षानंतर शेख इस्त्राईल यांची निवड

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शिक्षण पूर्ण होऊन तब्बल १८ वर्षे उलटली, तरी शिक्षक होण्याचे स्वप्न मनाशी बाळगून अभ्यासाची साथ न सोडणाऱ्या सय्यद इस्त्राईल इस्माईल यांनी अखेर आपल्या जिद्द व मेहनतीच्या जोरावर यश मिळवले. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून त्यांची नागपूर जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षक म्हणून निवड झाली असून, त्यांच्या या यशाचे रिसोड शहरात सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी सातत्याने अभ्यास सुरू ठेवला.



या काळात शैक्षणिक तसेच कॉम्प्युटर क्लासेसच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कामही केले. त्यांच्या यशानिमित्त महम्मद शेख रऊफ शेख, डॉ. अझहर शेख, पत्रकार फिरोजशाह, सैय्यद इरफान व अल्ताफ शेख यांच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व पेढा देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांच्या आई-वडिलांचाही शाल व हार देऊन सन्मान करण्यात आला. १८ वर्षांचा कालावधी उलटूनही अभ्यासाची साथ न सोडता त्यांनी शिक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण केले. त्यांचे हे यश जिद्द, सातत्य आणि कठोर परिश्रमाचे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

---

# रिसोडच्या वाढीव पाणीपुरवठ्यास ७४ कोटी ६ ४ लाखाचा निधी !

## अनंतरावजी देशमुख , नकुलदादा देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

● राहुल जुमडे @ रिसोड ●

रिसोड शहरातील नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या वाढीव पाणीपुरवठा योजनेला मोठे यश मिळाले असून, या कामासाठी ७४ कोटी ६४ लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भातील शासनादेश प्रसिद्ध झाल्याने रिसोड शहरातील पाणीपुरवठ्याचा महत्त्वपूर्ण प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने निर्णायक पाऊल पडले आहे.

रिसोड शहराचा वाढता विस्तार, वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा प्रकल्पाची आवश्यकता होती. नागरिकांच्या या महत्त्वपूर्ण प्रश्नासाठी माजी मंत्री लोकनेते मा. अनंतरावजी देशमुख





तसेच भारतीय जनता पक्षाचे रिसोड-मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख मा. नकुलदादा देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, शासनाकडून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

### माजी मंत्री देशमुख यांचा सातत्याने पाठपुरावा

रिसोड येथे पार पडलेल्या सभेत पत्राद्वारे व प्रत्यक्ष भाषणातून अनंतरावजी देशमुख यांनी मागणी केल्यानंतर तेव्हा उपमुख्यमंत्री असलेले आणि आत्ताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागणी पूर्ण करणार असल्याचे आश्वासन दिल्यानंतर वेळोवेळी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेत माजी खासदार अनंतराव देशमुख, भाजपा नेते नकुल देशमुख यांनी पाठपुरावा केला त्याचेच फलित म्हणून रिसोड शहरास वाढीव पाणीपुरवठा आरक्षण प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. हा महत्त्वपूर्ण प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करणारे माजी मंत्री लोकनेते मा. अनंतरावजी देशमुख, भाजपा नेते मा. नकुलदादा देशमुख व सौ. अमृताताई देशमुख यांचेही नागरिकांकडून अभिनंदन होत आहे. रिसोड शहराचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागू शकतो या संदर्भात चर्चा केली असता याबाबतीत आवश्यक ती कागदपत्रे कार्यवाही करून माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे या संदर्भात मागणी करून पाठपुरावा करणार असल्याचे पत्रकार परिषदेत माजी मंत्री अनंतरावजी देशमुख म्हणाले. यावेळी नगराध्यक्ष भगवानराव क्षिरसागर उपस्थित होते.

---

# जाफराबादहून पिंपरी सरहद्दपर्यंत... निखाऱ्याच्या धगीत लोहार कुटुंबाची रोजीरोटी !

## शेतकऱ्यांच्या कृषी अवजारांना धार देत, लोखंडाला आकार देत सुरू आहे उदरनिर्वाहाची धडपड

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

**रिसोड तालुक्यातील पिंपरी सरहद्द येथे मेहकर-मालेगाव महामार्गालगत जाफराबाद, जि. जालना येथून आलेल्या लोहार कुटुंबाने आपले छोटेसे दुकान थाटले आहे. शेतकऱ्यांच्या कृषी अवजारांची दुरुस्ती, धार लावणे तसेच लोखंडी साहित्याची विविध कामे करून हे कुटुंब आपल्या कष्टावर उदरनिर्वाह चालवत आहे.**



सकाळपासूनच निखाऱ्याची धग, हातोड्याचे घाव आणि लोखंडाचा आवाज अशा वातावरणात त्यांचे काम सुरू असते. कुऱ्हाड, कोयता, विळा, खुरपे, फावडे यांसारख्या शेती उपयोगी अवजारांना धार लावणे व दुरुस्ती करण्याचे काम ते करतात. शेतकऱ्यांच्या गरजेनुसार लोखंडाला आकार देत त्यांच्या शेतीकामासाठी आवश्यक साहित्य तयार करून दिले जाते. मूळचे जाफराबाद, जिल्हा जालना येथील हे लोहार कुटुंब कामाच्या शोधात पिंपरी सरहद्द येथे येऊन महामार्गालगत आपला पारंपरिक व्यवसाय सुरू ठेवत आहे.

घरापासून दूर येऊन, उन्हाची-वाऱ्याची तमा न बाळगता मेहनत करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याची त्यांची धडपड कौतुकास्पद आहे. आधुनिक युगात अनेक व्यवसायांमध्ये बदल झाले असले तरी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी पारंपरिक लोहारांचे काम आजही महत्त्वाचे आहे. निखाऱ्यावर तापणारे लोखंड आणि त्यावर पडणारा हातोड्याचा प्रत्येक घाव या कुटुंबाच्या कष्टाची कहाणी सांगत आहे.

---

# नादुरुस्त रोहित्राने सोयाबीन पीक धोक्यात !

## *चिखली शेत शिवारातील वीस दिवसापासून डीपी बंद सोयाबीन पीक सुकण्याच्या मार्गावर *महावितरणच्या गलथान, कारभारामुळे शेतकऱ्यावर संकट

● सिटी न्युज ब्युरो @ कवठा ●

पावसाने दडी मारल्याने आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसमोर आता महावितरणच्या कारभारामुळे नवे संकट उभे ठाकले आहे. रिसोड तालुक्यातील चिखली शिवारातील शेतकरी शेतातील रोहित्र मागील २० दिवसापासून बंद असून, तसेच अधिक काळापासून नादुरुस्त असल्याने तब्बल ५० एकरातील सोयाबीन पीक पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर आहे. वारंवार तक्रारी करूनही रोहित्र दुरुस्त करण्यात आले नसल्याने शेतकऱ्याने संताप व्यक्त केला आहे.

तांत्रिक बिघाड झाल्याने ते रोहित्र मागील वीस दिवसापासून बंद आहे. रोहित्र बंद असल्यामुळे शेतातील विद्युत पंप चालत नसून पिकाला आवश्यक पाणी देता येत नाही. याबाबत चिखली परिसरात नागरिकांनी महावितरण कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे वारंवार तक्रार करून रोहित्र दुरुस्त करण्याची मागणी केली. मात्र, अद्यापही त्यांच्या तक्रारीची प्रभावी दखल घेण्यात आलेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सध्या सोयाबीन शेंगाच्या अवस्थेत असून, पीक धरण्याच्या महत्त्वपूर्ण अवस्थेत आहे. या काळात पिकाला पुरेसे पाणी मिळणे अत्यंत आवश्यक असते. मात्र, रोहित्र बंद असल्यामुळे सिंचन करणे शक्य होत नसल्याने उभे पीक हळूहळू वाळत चालले आहे. पिकाची सध्याची अवस्था पाहता वेळेत वीजपुरवठा सुरळीत झाला नाही, तर संपूर्ण कापसाचे पीक हातचे जाण्याची भीती शेतकऱ्याने व्यक्त केली आहे. एकीकडे पावसाचा मोठा खंड पडल्याने शेतकरी चिंतेत असताना दुसरीकडे नादुरुस्त रोहित्रामुळे सिंचनाची सुविधा बंद पडली आहे. त्यामुळे शेतकऱ्याला दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे. पिकासाठी आतापर्यंत केलेला खर्च, मेहनत आणि मिळणाऱ्या उत्पन्नाची अपेक्षा या सर्वांवरच संकट






आले आहे. पिकाचे नुकसान होण्यापूर्वी महावितरण प्रशासनाने तातडीने दखल घेऊन रोहित्र दुरुस्त करावे आणि वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी चिखली शेत शिवारातील शेतकऱ्यांनी केली आहे. दरम्यान, रिसोड तालुक्यात अजून, येथे उपयोगीही मोठी कमतरता आहे. अशा परिस्थितीत शेती हाच शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मूलभूत गरजांकडे महावितरण प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. नादुरुस्त रोहित्रामुळे पिकाचे नुकसान झाल्यानंतर भरपाई देण्यापेक्षा वेळेत वीजपुरवठा सुरळीत करून पीक वाचविणे महत्त्वाचे आहे, अशी मागणी चिखली परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## 35 दिवसांपासून पाऊस गायब

**खामगावः** तब्बल 35 दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. त्याचा परिणाम खरिपाच्या पिकांवर दिसू लागला आहे. आज येईल, उद्या येईल या आशेवर शेतकरी आभाळाकडे पाहत आहे. मात्र आता परतीच्या पावसाचा कालावधीही सुरु झाला असल्याने या पावसावर शेतकऱ्याची मदार असली तरी परतीचा पाऊसही आता बेभरोशाचा झाला आहे.<यंदा सुरुवातीपासूनच पावसाला विलंब झाला आहे. त्यामुळे पेरण्याही उशिराने सुरु झाल्या. मधल्या काळात पावसाने दमदार हजेरी लावल्याने पीक परिस्थितीत सुधारणा झाली. नदी, नाले दुधळी भरून वाहल्याने प्रकल्पातील पाण्याच्या पातळीतही वाढ झाली. मात्र आता गेल्या 35 दिवसापासून जिल्ह्यात सार्वत्रिक पाऊस झाला नाही.

# बुलडाणा जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा

## खामगावात काँग्रेसचे आंदोलन : शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**खामगाव :** पावसाने दडी मारल्यामुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, बुलडाणा जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, या मागणीसाठी आज दि.४ सप्टेंबर रोजी किसान काँग्रेस व खामगाव विधानसभा काँग्रेस कमिटीच्या वतीने येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. यावेळी वाळलेल्या सोयाबीनच्या पेंढ्या हातात घेऊन कार्यकर्त्यांसह शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या विरोधात तसेच शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी एसडीओ डॉ.रामेश्वर पुरी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना मागण्यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमुद आहे की, बुलडाणा जिल्ह्यात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्यामुळे गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी शेतातील सोयाबीन, तूर तसेच इतर सर्व पिके सुकत असून नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

त्यामुळे शेतकरी बांधवांसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत सापडला आहे. या प्रतिकूल परिस्थितीमुळे काही शेतकरी बांधवांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाने या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन बुलडाणा जिल्ह्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करावा, कर्जमाफी जाहीर झालेली असली तरी विविध निकषांमुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे



सर्व थकीत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, शेतातील पिकांना आवश्यक पाणी उपलब्ध होण्यासाठी विद्युत पुरवठा दिवसभर व नियमित स्वरूपात करण्यात यावा, नादुरुस्त विद्युत डी.पी. (ट्रान्सफॉर्मर) विनाविलंब दुरुस्त करून वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात यावा, पावसाअभावी झालेल्या पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई व आर्थिक मदत देण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष तेजेंद्रसिह चौहाण, शहराध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रकाश इंगळे, किसान काँग्रेस कार्याध्यक्ष कैलास साबे, काँग्रेस ओबीसी सेलचे नेते कैलास फाटे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष अचलेश्वर दिपके, जिल्हा संघटन सचिव अतुल सिरसाट, सचिन जयस्वाल, मनोज बोदडे, गजानन हागे, राजकुमार शेगोकार, ॲड.अशोक इंगळे, सुभाष वावगे, गणेश वाशिमकर, अनिल टेके, सचिन देशमुख, मंगेश भारसकाळे, प्रमोद चिंचोळकार, अमोल वावगे, प्रविण मेहसने, छोटुसिंग राजपूत, गोपाळ चव्हाण, शिवदास घ्यार, ज्ञानदेव कोरे, हरिभाऊ उगले, सहदेव वासनकार, महादेव कळसकार, गजानन रहित, समाधान वासनकार, बळीराम वासनकार, श्रीकृष्ण धानोरे, गजानन तायडे, मोहम्मद वसीमोद्दीन, काजी अमिर, गजानन हिंगणे, गुलाबराव निंबाळकर, पांडुरंग राखोंडे, विकास घ्यार, संभाजी घ्यार, अजय पवार, शिवदास पारसकर, शिवशंकर वाशिमकर, नितीने डोंगे, अमोल डोंगे, अविनाश इंगळे, कैलास वासनकार यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सुकलेल्या पेंढ्या आणि अश्रृधारा

» एसडीओ डॉ.रामेश्वर पुरी यांच्या सोबत चर्चा करताना शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील वाळलेल्या पिकांच्या पेंढ्या दाखवत व्यथा मांडल्या. आधीच कर्जबाजारी असताना उसनवारीने पैसे घेवून शेतकऱ्यांनी यंदाचा हंगामातून काहीतरी हाती पडले या आशेने पेरणी केली होती. मात्र निसर्गाने दगा दिल्यामुळे शेतकरी हवालदील झाला असून व्यथा मांडताना शेतकऱ्यांना डोळ्यातून अश्रृंचा बांध फुटला.

## राष्ट्रीय महामार्गालगतची रोपटी पाण्याअभावी सुकली!

### महिनाभरापासून पाऊस नाही; वृक्ष संगोपनाकडे संबंधित यंत्रणेचे दुर्लक्ष!

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**खामगाव :** राष्ट्रीय महामार्गालगत करण्यात आलेल्या वृक्षारोपणातील अनेक रोपटी पाण्याअभावी सुकू लागली असून, काही रोपटी पूर्णपणे वाळली आहेत. टेंभुर्णा-कोलरी फाट्यादरम्यान महामार्गाच्या दुतर्फा लावण्यात आलेल्या रोपट्यांच्या संगोपनाकडे संबंधित यंत्रणेकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. महामार्गाच्या कडेला पर्यावरण संवर्धनासोबतच रस्त्याच्या सौंदर्यात भर पडावी, या उद्देशाने विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. सुरुवातीच्या काळात या रोपट्यांना पाणी देणे, त्यांचे संरक्षण करणे आणि नियमित देखभाल करणे आवश्यक असते; मात्र प्रत्यक्षात या बाबींकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याने लावण्यात आलेल्या रोपट्यांपैकी काही सुकून गेली आहेत. गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने महामार्गालगतच्या नव्या रोपट्यांना नैसर्गिक पाण्याचा आधार मिळालेला नाही.

**पाणी देण्याची व्यवस्था करावी!**

महामार्गालगतची झाडे भविष्यात मोठी होऊन प्रवाशांना सावली देण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही महत्त्वाची ठरणार आहेत. त्यामुळे सुकत असलेल्या रोपट्यांकडे तातडीने लक्ष देऊन त्यांना नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी पर्यावरण प्रेमींमधून होत आहे.

**मृत रोपट्यांच्या जागी नव्याने लागवड करा!**

पाण्याअभावी सुकलेली किंवा पूर्णपणे वाळलेली रोपटी काढून त्या ठिकाणी नव्याने वृक्षलागवड करणे आवश्यक आहे. महामार्गालगतची हिरवाई कायम राहण्यासाठी केवळ एकदाच वृक्षारोपण न करता, मृत रोपट्यांच्या जागी पुनर्लागवड करणेही गरजेचे आहे

## चाकूहल्ला प्रकरणात आरोपीला तीन वर्षांचा सश्रम कारावास

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**खामगाव :** पाण्याच्या टाक्या ठेवण्याच्या कारणावरून झालेल्या वादात तरुणावर चाकूने हल्ला केल्याच्या तब्बल १२ वर्षे जुन्या प्रकरणाचा न्यायालयीन निकाल लागला आहे. खामगाव जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी भानुदास पांडुरंग अतकरे याला दोषी ठरवत तीन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. शिवाजी नगर परिसरातील शकुंतला अंबादास जाधव यांच्या घरामागे पाण्याच्या टाक्या ठेवण्यावरून १८ ऑक्टोबर २०१४ रोजी वाद झाला होता. याच वादातून भानुदास अतकरे याने शिवदास अंबादास जाधव यांच्यावर चाकूने हल्ला केला. या घटनेनंतर शकुंतला जाधव यांच्या फिर्यादीवरून शिवाजी नगर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर खटल्याची सुनावणी सुरू झाली. मात्र, सुनावणीदरम्यान जखमी शिवदास जाधव यांचा मृत्यू झाला. खटल्यात सरकार पक्षाने एकूण ११ साक्षीदार तपासले. अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. उदय आपटे यांनी सरकार पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. जिल्हा व सत्र न्यायाधीश सी. एम. बागल यांनी ३ सप्टेंबर रोजी आरोपी भानुदास अतकरे याला दोषी ठरविले.

न्यायालयाने त्याला तीन वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

## विनापरवाना वाळूची अवैध वाहतूक; 8 लाख 10 हजारांचा मुद्देमाल जप्त, दोघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**मलकापूर :** राष्ट्रीय महामार्गा क्र.५३ वरील अग्रवाल पॅकर्ससमोर एमआयडीसी पोलिसांनी अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई केली.

पोलिसांना पाहून रस्त्यावर वाळू ओतून पळ काढणाऱ्या चालकासह ट्रॅक्टर मालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, विनाक्रमांकाच्या ट्रॅक्टरसह ८ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३ सप्टेंबर रोजी दुपारी १:३० वाजेच्या सुमारास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पथक गस्तीवर असताना अग्रवाल पॅकर्ससमोर एक विनाक्रमांकाचे निळ्या रंगाचे ट्रॅक्टर अवैध वाळूची वाहतूक करताना आढळून आले. पोलिसांनी ट्रॅक्टर चालकाला वाहन थांबवण्याचा इशारा केला; मात्र चालकाने वाहन न थांबवता पोलीस कारवाईपासून वाचण्यासाठी ट्रॅक्टरमधील वाळू रस्त्यावरच खाली केली व पळ काढला. मात्र, घटनास्थळी असलेल्या ट्रॅक्टर मालकाकडून चालकाची ओळख पटवून पोलिसांनी विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर किंमत ८ लाख रुपये आणि १ ब्रास वाळू किंमत १० हजार रुपये असा एकूण ८ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अंमलदार संदीप कळसकार यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी ट्रॅक्टर चालक स्वप्रील कैलास जुमळे (वय २६) रा.अहिल्यादेवी नगर मुक्ताईनगर व ट्रॅक्टर मालक अजय पाटील रा.साळबडी, ता.मुक्ताईनगर, जि. जळगाव या दोघांविरूध्द अप.क्र.१०८/२०२६ कलम कलम ३०३(२) सह कलम २१ (१), २१ (२) गौनखनिज अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार संदीप पवार करीत आहेत.

## गणेशोत्सवासाठी तयारीला वेग!

### गणेश मंडळांकडून मंडप उभारणीसह सजावट!

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**खामगाव :** गणेशोत्सवाला अद्याप काही दिवसांचा अवकाश असला, तरी शहरात सार्वजनिक गणेश मंडळांकडून उत्सवाची तयारी आतापासूनच सुरू करण्यात आली आहे. विविध मंडळांनी मंडप उभारणी, सजावट, तसेच उत्सवाच्या नियोजनाशी संबंधित कामांना सुरुवात केल्याने शहरात गणेशोत्सवाची चाहूल लागली आहे. गणेशोत्सव हा शहरातील प्रमुख उत्सवांपैकी एक असल्याने विविध गणेश मंडळांकडून दरवर्षी उत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाही मंडळांनी नियोजनाला सुरुवात केली असून, गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणाऱ्या ठिकाणी मंडप उभारणीची कामे सुरू झाली आहेत. काही ठिकाणी मंडपासाठी आवश्यक साहित्य आणून ठेवण्यात आले असून, मंडपाची रचना आणि सजावटीचे नियोजन करण्यात येत आहे. मंडप उभारणीनंतर आकर्षक विद्युत रोषणाई, सजावट, देखावे आणि अन्य बाबींवर भर देण्यात येणार आहे. उत्सवाच्या कालावधीत भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने मंडळांकडून नियोजनबद्ध पद्धतीने तयारी करण्यात येत आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सभापती प्रवीण कदम यांच्या देखरेखीखाली ३ सप्टेंबर रोजी पालिकेच्या विद्युत विभागाची बैठक झाली.

**न.पा. कडून विसर्जन व्यवस्थेचे नियोजन !**

गणेशमूर्ती विसर्जनासाठी प्रशासनाकडूनही तयारी सुरू करण्यात आली आहे. मोठ्या विहिरीची ४ सप्टेंबर रोजी साफसफाई करण्यात आली. तसेच जनुना तलावावरील विसर्जन घाटावरही आवश्यक कामे केली जात आहेत.

## व्यापाऱ्यांना मारहाण प्रकरण; शेगावात सहा जणांविरुद्ध गुन्हा

### जुन्या बिलाच्या वादातून अपहरण केल्याचा आरोप

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**शेगाव :** छत्रपती संभाजीनगर येथील व्यापारी विकास रामदास वाणी (४३) यांचा मृतदेह ३ सप्टेंबर रोजी खामगावातील अग्रसेन चौकात आढळून आला होता. त्यापूर्वी जुन्या बिलाच्या वादातून शेगाव येथे वाणी आणि त्यांच्या सहकाऱ्याचे अपहरण करून मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी गुरुवारी रात्री उशिरा सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रामेश्वर लक्ष्मण चौधरी (२९) हे विकास वाणी यांच्यासोबत महालक्ष्मी मातेच्या मुखवट्यांचा हंगामी व्यवसाय करतात. २ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजता दोघे मालवाहू वाहनाने (एमएच २० ईएल १९०६) शेगावकडे रवाना झाले होते. तक्रारीनुसार, रात्री १० वाजताच्या सुमारास दोघे शेगावातील संविधान चौकात असताना सुरज खानजोडे, सागर खानजोडे यांच्यासह चार ते पाच जणांनी जुन्या बिलाच्या कारणावरून वाद घालत शिवीगाळ व मारहाण केली. त्यानंतर वाणी यांना चारचाकी वाहनात जबरदस्तीने बसवून दोघांना एका कारखान्यात नेण्यात आले तेथे पुन्हा मारहाण करून महत्त्वाची कागदपत्रे काढून घेण्यात आली, तसेच त्यांनी खरेदी केलेला माल जुन्या गोदामात उतरवून घेण्यात आल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेनंतर वाणी भीतीपोटी खासगी वाहनाने खामगावकडे गेले, तर चौधरी यांनी खामगाव रोडवरील पेट्रोल पंपावर रात्र काढली. दुसऱ्या दिवशी, ३ सप्टेंबर रोजी सकाळी विकास वाणी यांचा मृतदेह खामगावातील अग्रसेन चौकात आढळून आला.३ सप्टेंबर रोजी सकाळी ८:४० वाजता विकास वाणी यांचे भाऊ योगेश वाणी यांनी रामेश्वर चौधरी यांना फोन करून विकास हे खामगावातील अग्रसेन चौकात मृतावस्थेत आढळल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. या प्रकरणी रामेश्वर चौधरी यांच्या तक्रारीवरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात सुरज खानजोडे, सागर खानजोडे यांच्यासह अन्य व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रमेश भामोदकर करीत आहेत. दरम्यान, विकास वाणी यांच्या मृत्यूचा या घटनेशी नेमका संबंध आहे का, तसेच मृत्यूचे कारण काय आहे, हे तपास आणि शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट होणार आहे.

## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

### निमगाव येथील घटना : आकस्मिक मृत्यूची नोंद

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**नांदुरा :** तालुक्यातील निमगाव येथे युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ४ सप्टेंबर रोजी सकाळी उघडकीस आली. किसना सुखदेव ईवरकार (४०, रा. निमगाव) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, किसना ईवरकार यांचा मुलगा युवराज याने पहाटेच्या सुमारास काका विष्णू जगदेव ईवरकार (३७) यांना उठवून वडिलांनी दत्तनगर परिसरातील प्लॉटिंगमधील निंबाच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे सांगितले. त्यानंतर विष्णू ईवरकार यांनी गजानन इंगळे, प्रकाश मुरहे व पुरुषोत्तम दळवी यांना माहिती देऊन त्यांच्यासह घटनास्थळी धाव घेतली. तेथे किसना ईवरकार हे मृतावस्थेत आढळून आले. किसना ईवरकार यांची मानसिक स्थिती ठीक नसल्याने त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, अशी माहिती फिर्यादीने दिली असून, त्यांच्या मृत्यूबाबत कोणताही संशय नसल्याचेही नमूद केले आहे. विष्णू ईवरकार यांच्या फिर्यादीवरून नांदुरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास ठाणेदार जयवंत सातव यांच्या आदेशाने सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक गजानन इंगळे करीत आहेत. शवविच्छेदनानंतर किसना ईवरकार यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात वृद्ध वडील, पत्नी, दोन मुले व दोन मुली असा परिवार आहे. या घटनेमुळे शोककळा पसरली आहे

## दोन वर्षापासून उभ्या असलेल्या स्ट्रक्चरवर डि.पी बसवा!

### मागणी मान्य न झाल्यास कार्यालयाची तोडफोड करण्याचा ॲड रावळ व ठोसर यांचा इशारा

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**मलकापुरः** तालुक्यातील जांबुळधाबा येथील लोणवाडी शिवारातील आ.संचेती बंधूंच्या गट नंबर १८५ मधील डी.पी तात्काळ बसवा अन्यथा सोमवारला म.रा. वि.वि कंपनी कार्यालयाची तोडफोड करण्याचा इशारा लोकनेते ॲड हरीश रावळ, शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी कार्यकारी अभियंता आर.जी तायडे यांना आज दुपारी दिला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,तालुक्यातील जांबुळधाबा येथील लोणवडी शिवारातील आमदार चैनसुख संचेती व त्यांचे बंधू सुरेश संचेती यांची गट नंबर १८५ मध्ये शेती आहे. या शेतीमध्ये शेतकऱ्यांसाठी गेल्या दोन वर्षांपूर्वी आमदार संचेती यांच्या प्रयत्नातून डी.पीसाठी स्ट्रक्चर उभारण्यात आले





मात्र डि.पी ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले नाही,दोन वर्षापासून संबंधित शेतकऱ्यानी चकरा मारल्या मात्र या डीपीवर ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले नाही. सद्यस्थितीत पावसाळा सुरू असून गेल्या महिन्याभरापासून पावसाने दडी मारली आहे, शेतातील विहिरीमध्ये पाणी उपलब्ध असताना सुद्धा केवळ लाईट नसल्यामुळे पिकांना पाणी देता येत नाही, डोळ्यादेखत पिके सुकू लागली असल्याने या डीपीवरील ३५ ते ४० शेतकऱ्यांनी लोकनेते ॲड हरीश रावळ व शिवसेना (उबाठा )उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांची भेट घेऊन आपबिती कथन केली. सर्व संबंधित शेतकऱ्यांना घेऊन रावळ व ठोसर यांनी म.रा. वि.वि कंपनीचे कार्यकारी अभियंता आर.जी तायडे यांचे भारत कला रोडवरील कार्यालय गाठले, कार्यालयात अधिकारी उपस्थित नसल्याने तब्बल तीन तास ठिय्या आंदोलन केले. या दरम्यान तायडे मोताळा येथे व्यस्त असल्याने भ्रमणध्वनीवरून त्यांच्याशी चर्चा करण्यात आली व दोन वर्षापासून उभ्या असलेल्या स्ट्रक्चरवर दोन दिवसांत डी.पी न बसविल्यास सोमवार रोजी म.रा.वि.वि कंपनी कार्यालय तोडफोड करण्याचा इशारा हरीश रावळ व गजानन ठोसर यांनी दिला.यावेळी माजी नगरसेवक पांडुरंग चिम, किसान सेना उपतालुकाप्रमुख विश्वनाथ पुरकर,वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, शाखाप्रमुख सत्तार शाह, जांबुळधाबा येथील शेतकरी विनायक जवरे, विजय मोरे, निना झांबरे, गोकुळ पाटील, राजू वाघोदे, अनिल झांबरे, गजानन पाटील आदि उपस्थित होते.

## धरणगाव ग्रामपंचायतीच्या विकासकामांचे तांत्रिक व आर्थिक ऑडिट करा!

### मागील कामांची सखोल चौकशीची मागणी; ३० दिवसांत कार्यवाही न झाल्यास उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**मलकापूर :** धरणगाव ग्रामपंचायत, ता. मलकापूर, जि. बुलढाणा येथे मागील कालावधीत शासन तसेच ग्रामपंचायतीच्या विविध निधीतून करण्यात आलेल्या विकासकामांची सखोल, निष्पक्ष चौकशी करून तांत्रिक व आर्थिक ऑडिट (लेखापरीक्षण) करण्यात यावे, अशी मागणी करणारा अर्ज गटविकास अधिकारी, पंचायत समिती मलकापूर यांच्याकडे करण्यात आला आहे. धरणगाव ग्रामपंचायतीअंतर्गत रस्ते, नाली बांधकाम, पेव्हर ब्लॉक, पाणीपुरवठा योजना तसेच इतर विविध विकासकामे करण्यात आली आहेत. या कामांसाठी मंजूर झालेला निधी शासनाच्या नियमांनुसार व मंजूर अंदाजपत्रकानुसार खर्च झाला आहे का? प्रत्यक्षात मंजूर



प्रमाणात काम झाले आहे का? कामाची गुणवत्ता योग्य आहे का? तसेच मंजूर रक्कम आणि प्रत्यक्ष खर्चामध्ये काही तफावत आहे का? याची सखोल तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**कागदपत्रांचीही होणार का तपासणी?**

चौकशीदरम्यान संबंधित कामांची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, ग्रामपंचायत ठराव, अंदाजपत्रक, कार्यादेश, निविदा अथवा कोटेशन प्रक्रिया, मोजमाप पुस्तिका (रूक्च), बिल-व्हाउचर, देयक नोंदी, योजना व निधीचे अभिलेख, काम पूर्णत्व प्रमाणपत्र आणि उपयोगिता प्रमाणपत्र यांची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी अर्जात करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून कागदोपत्री नोंदी आणि प्रत्यक्ष काम यांची तुलनात्मक पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**अनियमितता आढळल्यास जबाबदारी निश्चित करण्याची मागणी**

चौकशीदरम्यान आर्थिक अनियमितता, निधीचा अपव्यय, नियमबाह्य देयके, कागदपत्रांमध्ये अनियमितता, कामाच्या प्रमाणात तफावत किंवा अन्य कोणताही गैरव्यवहार आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, ठेकेदार किंवा इतर जबाबदार व्यक्तींची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अर्जदाराने केली आहे. शासकीय निधीचा गैरवापर झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास संबंधितांकडून नुकसानभरपाई अथवा रक्कम वसूल करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

**३० दिवसांत चौकशी सुरू करा; अन्यथा उपोषण**

या प्रकरणात अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत प्राथमिक चौकशी सुरू करून आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
८
शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# अकोलेकरांना टंचाईचे चटके नको

## पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन करा - आ.सावरकर

प्रतिनिधी ५ सप्टेंबर




**अकोला:** अकोला महानगरपालिका क्षेत्रामध्ये संभाव्य पाणी टंचाई संदर्भात आमदार रणधीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी सायंकाळी मनपा आयुक्त यांचे दालनात संभाव्य पाणी टंचाई संदर्भात तातडीने उपाययोजना करण्यासाठी नियोजन बैठक संपन्न झाली, या बैठकीत महापौर, मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने, मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, भाजपा शहर अध्यक्ष जयंत मसने, उपमहापौर अमोल गोगे, सभागृहनेता पवन महल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीमध्ये प्रभाग क्रं. १, २ व ३ चा काही भागात पाणी पुरवठा करण्यासाठी चोहोट्टा येथून ८४ खेडी करीता अस्तित्वात असलेल्या पाईपलाईनवरून जोडणी करून ३५० मि.मि. व्यासाची पाईपलाईन टाकून व्यवस्था करणे, प्रभाग क्रं४ करीता सांगळूद धोतर्डीच्या ६४ खेडी योजनेवरून पाईप लाईन टाकून व्यवस्था करणे, प्रभाग क्रं. १९ व २० करीता बार्शिटाकळी तालुक्यातील मोठया विहीरी अधिग्रहित करून टँकर व्दारे पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे, मोर्णा प्रकल्प ता.पातूर येथे ताशी २० लक्ष लिटर क्षमतेचे पंप बसवून मोर्णा ते जलशुध्दीकरण केंद्र महान पर्यंत ६०० मि.मि.व्यासाची पाईपलाईन टाकणे, दगडपारवा ते महान मोठया व्यासाची पाईपलाईन टाकून पाणी पुरवठा करण्याची व्यवस्था करणे या व्यतिरिक्त शहरातील मोठया विहीरी, हाईड्रंट, हाय इल्डिंग बोअर अधिग्रहित करणे, तसेच सद्या स्थितीत उपलब्ध असलेल्या २१.३१३ द.ल.घ.मि. जलसाठानुसार आवश्यक खबरदारी म्हणून पाणी पुरवठ्याचे पुन्हा नियोजन करून दिवसांमध्ये वाढ करून पाणी कपात करून वाचविणे व नागरिकांना आवाहन करणे आदिंबाबत सुचना यावेळी आमदार श्री रणधीरजी सावरकर यांनी दिली. या बैठकीत अकोला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता चिन्मय वाकोडे, म.जि. प्रा.विभागाचे कार्यकारी अभियंता निलेश राठोड, सहा.अभियंता निखिल राऊत, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता अतुल साळुंके, उपअभियंता श्रीमती उमाळे, मनपा पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता नरेश बावणे, श्रीकांत माणिकराव आदींची उपस्थिती होती.

### सणासुदीला पाणी टंचाईचे चटके

गेल्या वर्षी ५ सप्टेंबर रोजी काटेपुर्णा धरणात ९४ टक्के जलसाठा होता. आज मात्र २४ टक्के जलसाठा आहे. पुढील काळात पाऊस होईल देखील पण,आजचा जलसाठा पाहता महापालिकेने काटकसरीने पाणी पुरवठा सुरु केला आहे. शहरात आठ दिवसाआड आणि हद्दवाढीच्या भागात दहा दिवसाआड पाणी पुरवठा होण्याची शक्यता वाढली आहे. अकोलेकरांवर पुन्हा एकदा तीव्र पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. गेल्या वर्षी ४ सप्टेंबर रोजी काटेपूर्णा धरणात ९४ टक्के जलसाठा उपलब्ध होता; मात्र यंदा तो अवघा २४ टक्क्यांवर आल्याने चिंतेचे ढग जमा झाले आहेत. या घटत्या जलसाठ्यामुळे महापालिकेचे पाणीपुरवठ्याचे संपूर्ण नियोजनच कोलमडले आहे. पाण्याचे दुर्भिक्ष टाळण्यासाठी प्रशासनाने काटकसरीचे धोरण स्वीकारले आहे. यामुळे शहरात आता तब्बल आठव्या दिवशी, तर हद्दवाढीच्या नवीन भागात दहाव्या दिवशी पाणीपुरवठा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ऐन पावसाळ्यात महापालिकेचे नियोजन पुरते कोसळल्याचे चित्र असून, पाण्याच्या या विस्कळीत वेळापत्रकामुळे ऐन सणासुदीच्या दिवसांत अकोलेकरांचे प्रचंड हाल होत आहेत.

# शहरात सर्वत्र जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी





प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**अकोला:** सर्व लहान थोरांपासून तर मोठ्यांपर्यंत चे आवडते दैवत भगवान कृष्णाच्या जन्माचे प्रतीक म्हणून शुक्रवारी अकोला शहरातील सर्व कृष्ण मंदिरे फुले आणि रंगीबेरंगी विजेच्या दिव्यांनी सजवण्यात आली होती. मंदिर व्यवस्थापनाने भाविकांच्या सोयी आणि सुरक्षेवर विशेष लक्ष दिले. शहरातील सर्व मंदिरांमध्ये भगवान कृष्णाचा जन्म मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.

शहरातील गंगानगर परिसरातील सालासार मंदिर, जुने शहरातील लक्ष्मीनारायण मंदिर तसेच कृष्ण मंदिर सरकारी बगीच्या जवळील इस्कॉन मंदिर, गीता नगर परिसरातील रामदेव बाबा व श्यामदेव बाबा मंदिर आदी मंदिरात मंदिरात विशेष जन्माष्टमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे, राधाकृष्ण टॉकीज समोरील तोष्णीवाल कृष्ण मंदिरांमध्येही भगवान कृष्णाचा जन्म मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. शुक्रवारी राधा-कृष्ण मंदिरांमध्ये घंटा, बोल आणि शंखांचा आवाज घुमत होता. भगवान कृष्णाच्या दर्शनासाठी सरकारी बगीच्या जवळील इस्कॉन मंदिरात दर्शनासाठी आणि कृष्ण लीलांवर आधारित भजनांचा कार्यक्रम श्रवण करण्यासाठी भक्तांनी मोठी गर्दी केली होती. मध्यरात्रीचे १२ वाजताच, घंटा आणि शंखनादासोबत, नंदाच्या घरी आनंदीआनंद, जय कन्हैया लाल की... च्या जयघोषाचा गजर झाला. संपूर्ण परिसरात भक्तीचे वातावरण पसरले होते. दुग्धाभिषेकानंतर गोपाळाला सुंदर दागिने आणि वस्त्रे परिधान करण्यात आली. या प्रसंगी छप्पन्न भोग नैवेद्यही अर्पण करण्यात आले आणि शेवटी, आरती करून प्रसाद वाटण्यात आला.



# वन्य प्राण्यांनी केले कपाशी पिकाचे अतोनात नुकसान

प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**आलेगाव :** आलेगाव शेत शिवारामध्ये दिनांक ४ सप्टेंबर शेतकरी अमोल डीगांबर निखाडे हा तुषार संचाने कपाशी पिकाला पाणी देत असताना वन्यप्राण्यांनी रात्रीचे वेळेस धुडगूस घालून कपाशी पिकाचे अतोनात नुकसान पहात असताना मादा डूक्रनीने हल्ला करण्याचा प्रयत्न केला असता त्याने पळ काढून स्वतःला वाचविले.असले तरी वनप्रशासनाने वेळीच लक्ष देऊन वन्यप्राण्यांचा तात्काळ बंदोबस्त करून पाहणी करून नुकसान भरपाई करण्याची मागणी होत आहे.पातूर तालुक्यातील आलेगाव शेत शिवारामध्ये गेल्या पंचवीस दिवसांपासून पावसाने दडी मारली, त्यामुळे शेतकऱ्यांच्या खरीप पिकाने माना टाकल्याने,त्याला जीवनदान देण्यासाठी अमोल डीगांबर निखाडे हा शेतकरी आपल्या शेत सर्व्हे नंबर १७५/२ मध्ये तुषार संचाने पाणी कपाशी पिकाला नियमित जात असताना दिनांक ४ रोजी वन्यप्राण्यांनी कपाशी पिकाचे अतोनात नुकसान केल्याचे आढळून आले.तसेच तुषार पाईप उचलत असताना त्याला कपाशी पिकातून एक मादा डुक्कर सरळ चाल करून येत असल्याचे दिसून येताच त्याने पळ काढून आंब्याच्या झाडावर जाऊन बसला. पावसाने दडी मारल्यामुळे, शेकडो वन्यप्राण्यांनी शेतकऱ्यांच्या शेतपिकावर हल्ले सुरू करून पिके फस्त करीत आहेत.

### शासकीय आश्रमशाळेत शिक्षक भरती

**अकोला :** शासनाच्या आदिवास विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील गट-क (अराजपत्रित) पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलमार्फत शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया आजपासून सुरू झाली आहे. यासंदर्भातील सविस्तर जाहीर सूचना व वेळापत्रक अमरावती अपर आयुक्त कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार संपूर्ण पडताळणी प्रक्रिया ५ सप्टेंबरपर्यंत पार पडणार आहे.

# मां गायत्री प्राथमिक मराठी शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालयात शिक्षक दिन दहीहंडी उत्सव साजरा






प्रतिनिधी ५ सप्टेंबर

**अकोला:** मां गायत्री प्राथमिक मराठी शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय तसेच सनराइज किड्स कॉन्व्हेंट गायत्री नगर येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन आणि दहीहंडी गोपालकाला उत्सव उत्साहात साजरा झाला. विद्यार्थी राधा कृष्णाच्या वेशभूषेत सहभागी झाले होते.

शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सिद्धेश्वर देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्यावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. शाळेचे मुख्याध्यापक संदीप वाघ यांनी शिक्षक दिनानिमित्त मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक सुनील चव्हाण, शिक्षक रामेश्वर बुंदेले, मीना काटे, चंदा रोकडे, वर्षा हिवराळे, कल्पना सोळंके, वैशाली इंगळे, कीर्ती पोके, पूजा बुंदेले, हर्षा निंबोकार, शिक्षकेतर कर्मचारी चंद्रजीत देशमुख, योगेश लंगोटे, रणजीत ठाकूर उपस्थित होते.

# आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा मोर्चा

## वार्षिक महागाई नुसार डीबीटी मध्ये वाढीची मागणी

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**अकोला :** आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांची भोजन डीबीटी सुरू ठेवा तसेच या अनुषंगाने अन्य मागण्यासाठी वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. वाटेत घोषणा देत विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. मोर्चात विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सामील होत्या. आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांची भोजन डीबीटी सुरू ठेवा, वार्षिक महागाई नुसार डीबीटी मध्ये वाढ करा तसेच मेस बाबतीत २९ ऑगस्ट २०२६ चा शासन निर्णय रद्द करा या प्रमुख मागण्यांसाठी आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आज मोर्चा काढला. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात आला. त्या नंतर एका शिष्टमंडळाने मागण्यांचे निवेदन सादर केले. मोर्चा मध्ये विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. न्याय हवा न्याय हवा यासारख्या मागण्यांच्या समर्थनार्थ विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या.

# कापशी तलावातून अकोला महानगराला पाणी पुरवठा करा, सनातन संस्कृती महासंघ

प्रतिनिधी ५ सप्टेंबर




**अकोला :** कापशी तलावातून अकोला महानगराला पाणी पुरवठा करण्यात यावा. या आशयाचे निवेदन सनातन संस्कृती महासंघातर्फे राज्याचे जलसंपदा मंत्री यांना जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत देण्यात आले.

निवेदनात नमूद केले की, २००५ पासून अकोला महानगराला सतत पाणी समस्येचा सामना करावा लागतो आहे. अकोला महानगरा जवळ कापशी तलाव असून, महान येथील "काटेपुर्णा" प्रकल्प होईपर्यंत कापशी तलावातील पाण्याचा पुरवठा अकोला शहराला करण्यात येत होता. तेथे पंपींग स्टेशन देखील होते. काही वर्षांपूर्वी कापशी तलाव ते अकोला जलवाहिनी टाकण्याचे काम सुरु झाले होते. परंतु नंतर काम बंद झाले. महानगराची पाणी समस्या लक्षात घेता. कापशी तलावातील गाळाचा उपसा करून, नवीन जलवाहिनी टाकल्यास अकोला महानगराच्या काही भागास पाणी पुरवठा होवू शकतो. यामुळे काटेपुर्णा प्रकल्पावरील भार काही अंशी कमी होईल. या पाण्याचा पुरवठा औद्योगिक वसाहतीस केल्यास, उद्योगाला नवसंजीवनी मिळेल. रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

काटेपूर्णा प्रकल्पातील गाळाचा उपसा केल्यास जास्त पाणीसाठा राहील. महानगरातून वाहणाऱ्या मोर्णा नदीचे रुपांतर गटारात झाले आहे. नदीतील घाण, कचरा काढून, नदीचे खोलीकरण केल्यास पाणी जमीनीत मुरुन पाण्याची पातळी वाढेल. अकोला महानगरातील पाणी समस्येवर तोडगा काढण्याच्या दृष्टीने उपरोक्त सूचनांवर कारवाई करावी अशी मागणी सनातन संस्कृती महासंघातर्फे करण्यात आली आहे. निवेदन देण्यासाठी हेमंत जकाते, नरेंद्र कराळे, अमोल देशपांडे, महेश शाह, सुबोध देशमुख, युवराज राजगुरे, पंकज सिधारा, मनोज अग्रवाल, राजेंद्र मुळे, ऋषीकेश जकाते उपस्थित होते असे महासंघाचे प्रसिद्धीप्रमुख विजय केंदरकर यांनी कळवले आहे.

# शेतात विद्युत शॉक लागून 21 वर्षीय युवकाचा मृत्यू

प्रतिनिधी ५ सप्टेंबर



**आलेगाव प्रतिनिधी**

येथील भाजीपाला व्यावसायिक रमेश बंड यांचा २१ वर्षीय मुलगा प्रज्वल हा आलेगाव शेत शिवारा मध्ये गेल्या पंचवीस दिवसा पासून पावसाचा खंड पडल्यामुळे, पेरलेल्या कपाशी पिकाला कृषी पंपाचे पाणी देण्यासाठी ४ रोजी सकाळी घरून गेला. कृषी पंप सुरू करण्यासाठी स्टार्टर लावलेल्या लाकडी खोक्या जवळ गेला. प्रयत्न करूनही पंप सुरू होत नसल्याने त्याने फेज चेक करीत असताना त्याच्या हाताला विजेचा जबर झटका लागून बाजूला फेकल्या गेला. त्याचे वडील रमेश बंड हे शेतातच हजर होते.त्यांनी शेजारी असलेल्या शेतकऱ्यांना मदती करीता बोलविले आणि त्यांनी तात्काळ शेतातून आणून आलेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नेले. आरोग्य अधिकाऱ्यांनी तपासणी करून अकोला येथे उपचारा करीता हलविण्याचे सांगितल्या नुसार रुग्ण वाहिका नुसार अकोला येथील आयकॉन मध्ये नेण्यात आले.तेथील डॉक्टरांनी सर्वोपचार मध्ये नेण्याचे सांगितले परंतु तो पर्यंत प्रज्वलची प्राण ज्योत मालवली होती.अल्प भूधारक शेतकऱ्यावर तरुण मुलगा आकस्मिक पणे निघून गेल्याने त्यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावातून हळहळ व्यक्त होत आहे.

# आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये साकारला केरळच्या प्रसिद्ध पद्मनाभ मंदिराचा मनमोहक देखावा !

## भक्तिमय वातावरणात साजरी झाली श्रीकृष्ण जन्माष्टमी

प्रतिनिधी ५ सप्टेंबर





**अकोला.** आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये ४ सप्टेंबर रोजी सकाळी अकरा वाजता श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सण श्रद्धा, उत्साह आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला शाळेचे संचालक दिलीपराजजी गोयनका, सौरभ गोयनका, प्राचार्य कुरियचन सी.पी., उपप्राचार्य श्वेता चौमवाल, भारतीय सेवा सदनच्या सदस्या इंदुबाला चौधरी तसेच मुख्य समन्वयक शिक्षिका गुरनीत कौर ओबेरॉय यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या संस्थापिका आदरणीय स्व. मधू आई यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून तसेच भगवान श्रीकृष्णाचे पूजन आणि पंचआरतीने झाली. धूप, दीप आणि आरतीसोबतच "हाथी घोडा पालकी, जय कन्हैया लाल की" या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.या प्रसंगी कला शिक्षक सौरभ महल्ले यांनी केरळच्या प्रसिद्ध श्री पद्मनाभस्वामी मंदिराचा आकर्षक देखावा तयार केला होता. या देखाव्यात भगवान विष्णूंना शयन मुद्रेमध्ये दर्शवण्यात आले होते. आपल्या कलात्मकतेमुळे आणि भव्य सादरीकरणामुळे हा देखावा सर्वांच्या आकर्षणाचा मुख्य केंद्रबिंदू ठरला. या शुभप्रसंगी श्रीकृष्ण आणि त्यांच्या प्रियजनांचा सुंदर प्रवेश विद्यार्थ्यांच्या रूपात झाला, ज्यामध्ये श्रीकृष्ण, वसुदेव, राधा, मीरा, अर्जुन आणि बलराम यांचा समावेश होता. श्रीकृष्णाची आई यशोदा यांची भूमिका उपप्राचार्य श्वेता चौमवाल यांनी साकारली. या वेळी नृत्य विभागातर्फे भगवान विष्णूंच्या दशावतारावर आधारित सुंदर नृत्य सादर करण्यात आले.

जन्माष्टमीच्या विशेष प्रसंगी परंपरेनुसार भगवान श्रीकृष्णाला ५६ भोगाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेचे संचालक श्री दिलीपराजजी गोयनका यांनी उपस्थितांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा देत आपल्या विचारांतून मार्गदर्शन केले. भगवान पद्मनाभांविषयीची माहिती शिक्षिका शालिनी पूर्णये यांनी मांडली. कार्यक्रमाच्या शेवटी दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळच्या दहीहंडीचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थिनींनी उत्साहाने दहीहंडी फोडून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. दहीहंडी फुटताच संपूर्ण परिसर टाळ्यांच्या गजर आणि श्रीकृष्णाच्या जयघोषाने दुमदुमून गेला. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थी आणि शिक्षकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. या संपूर्ण कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन इयत्ता दहावीची विद्यार्थिनी वैष्णवी आढे आणि श्रेया आयने यांनी केले. आभार प्रदर्शन ब्लू हाऊसच्या प्रमुख शिक्षिका स्मिता मालपानी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्लू हाऊसच्या शिक्षकांनी विशेष योगदान दिले. शेवटी प्रसाद वाटपाने या सुंदर कार्यक्रमाची सांगता झाली.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार....

## 40 वर्षापासून रुग्णांवर यशस्वी उपचार

प्रतिनिधी ५ सप्टेंबर




**अकोला:** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात, मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoe-opathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.माझे नांव मिरा घुगे हिंगोली येथे राहते. मी नाईक होमिओपॅथी येथे येण्याअगोदर माझे पायाच्या टाचा दुखायच्या, ॲसीडीटी चा त्रास होता. वजन वाढले होते. नाईक होमिओपॅथी येथील उपचार सुरू करून माझे एका महिन्यात ५ किलो वजन कमी झाले. ॲसीडीटीचा त्रास कमी झाला. पायाच्या टाचा दुखणे कमी झाले. मी नाईक होमिओपॅथीच्या उपचाराने समाधानी आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135